# चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी




## ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

१९६२–२०१२

**Jnana Prabodhini Golden Jubilee 1962 - 2012**

# ज्ञान प्रबोधिनी

## 'समाज संस्थापनेसाठी नेतृत्व विकसन'





## संशोधन

- विविध सामाजिक व आर्थिक स्तरातील बुद्धिमत्तेच्या १२० पैलूंचा शोध व मापन
- प्रेरणा, प्रतिभा, गतिवाचन निर्णयक्षमता तसेच सामाजिक जाणीव व गटकार्य यावर संशोधन
- भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावावर संशोधन



## शिक्षण

- 'मनुष्य घडणीचे शिक्षण' या स्वामी विवेकानंदांच्या संकल्पनेचा क्रमिक शिक्षणाशी जोडलेला पथदर्शक प्रयोग
- अनौपचारिक शिक्षणाची समाजाभिमुख चळवळ
- गुरुकुल पद्धतीचे शहरात व ग्रामीण परिसरात प्रयोग

## विकास

- देशप्रश्नांच्या सोडवणुकीसाठी चारित्र्य व सक्षम नेतृत्वाची जडणघडण
- स्त्री शक्ती प्रबोधन
- नदीचे खोरे हा घटक मानून ग्रामीण विकासाचे बहुविध उपक्रम



## एकात्मता

- निवडक संस्कारविधींना कालोचित व सार्थ रूप देणाऱ्या पुस्तकांचे प्रकाशन
- सर्व जातीधर्मातील स्त्री-पुरुषांना पौराहित्याचे प्रशिक्षण
- राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्यासाठी विभिन्न विचारसरणींमध्ये पूल बांधण्याचे प्रयत्न.



## आरोग्य

- रोगप्रतिबंधक उपायांची जाणीवजागृती
- क्रीडाकुल संकल्पनेद्वारा स्पर्धात्मक खेळांचा प्रसार
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व जिव्हाळ्याचे मानवी संबंध यांवर आधारित रुग्णालये
- आयुर्वेद, योग, मानसोपचार इ. चा एकात्मिक वापर



केंद्र – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी उपकेंद्र – शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे, शिरवळ,
विस्तारकेंद्र – डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई, सांगली
प्रधान कार्यालय – ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०. दूरभाष क्र. (०२०) २४२०७०००
e-mail: contact@jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी

**भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक ध्यासपीठ !**
**स्वामी विवेकानंदांनी मांडलेली कल्पना - मनुष्यघडणीच शिक्षण !**
ते आजच्या काळात प्रत्यक्षात कसे येईल, याची एका स्वप्नवेडया संघटकाने केलेली एकात्म, तरीही व्यापक अन् विस्तारशील मांडणी.

डॉ. वि. वि. तथा आप्पासाहेब पेंडसे यांनी १९६२ मध्ये स्थापन केलेली 'ज्ञान प्रबोधिनी' ही शिक्षणसंस्था 'रूप पालटू देशाचे!' असे आपले उद्दिष्ट मानते.

देशापुढील विविध प्रश्न सोडविणे हे आपले जीवनध्येय असले पाहिजे, असे वाटणारे शेकडो युवक-युवती प्रबोधिनीच्या मांडणीतून नित्य घडावेत या हेतूने गेल्या ५० वर्षांत झालेला हा कार्यविस्तार.

शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, स्त्री शक्ती प्रबोधन, प्रशासन, उद्योजकता प्रशिक्षण, आरोग्य आणि राष्ट्रीय एकात्मता अशा विविध क्षेत्रांमध्ये पुढाकार घेऊन नेतृत्व करू शकतील असे प्रेरणासंपन्न व चारित्र्यशील कार्यकर्ते निर्माण व्हावेत, यासाठी प्रबोधिनी कटिबद्ध आहे.

अध्यात्म आणि ईशचिंतन यात नित्यनूतन, शास्त्रे व तंत्रज्ञान यात अद्ययावत व आधुनिक असा समाज निर्माण होण्यासाठी प्रबोधिनीचे शिक्षण आहे.

सर्व वयोगटांसाठी, सर्व जातिधर्मांमध्ये सलोख्याचे पूल बांधणारे, विविध विचारसरणींचा आदर करीत व्यापक हिंदुत्व म्हणजेच भारतीयत्व, प्रत्यक्ष आचरणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच म्हणजेच ज्ञान प्रबोधिनी.

मनुष्यघडणीच्या माध्यमातून समाज संस्थापनेची ही प्रक्रिया कशी घडू शकेल, या ध्येयाने झपाटून विविध क्षेत्रात केलेले हे अभिनव शैक्षणिक प्रयोग चित्ररूपाने ...

प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत
स्वामी विवेकानंदांना त्यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त सादर समर्पण !

सौर २२ पौष, शके १९३४ | १२ जानेवारी २०१३

# ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

१९६२-२०१२



**ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक**
**डॉ. वि. वि. तथा आप्पा पेंडसे**
*पी.एच.डी., एम. ए., एम.एड., बी.एस.सी.*
**जन्मदिन : १७ ऑगस्ट १९१६**
**निर्वाण दिन : १९ ऑगस्ट १९८३**

**मी स्वप्नं पाहणारा माणूस आहे.**

**अध्यात्म हा पाया, ज्ञानविज्ञानाची उपासना हे साधन, राष्ट्रभक्ती हे ध्येय, कर्तृत्वसंपन्न जीवन हा मार्ग, समाजाच्या सर्व स्तरांतून लोकसंघ निर्माण करणे हे उद्दिष्ट आणि 'रूप पालटू देशाचे' हा मंत्र घेऊन निघालेल्या प्रबोधिनीचे स्वप्न आप्पांनी रंगवलं.**

The Founder of Jnana Prabodhini
Dr V. V. alias Appa Pendse
(17th Aug 1916 - 19th Aug 1983)

# राष्ट्रसंतांच्या प्रकाशात



समर्थ रामदास



महर्षी दयानंद



स्वामी विवेकानंद



योगी अरविंद

देशातील आदर्श स्त्री-पुरुषांच्या अखंड मालिकेतील रामदास, दयानंद, विवेकानंद, अरविंद यांची प्रबोधिनीचे आदर्श राष्ट्रपुरुष म्हणून निश्चिती केली.

हे थोर पुरुष १) द्रष्टे, २) संन्यासी, ३) पूर्ण विकसित व्यक्तिमत्त्वाची कल्पना मांडणारे, ४) संघटनेचे सूत्र मांडणारे, ५) देशव्यापी संघटनेची कल्पना मांडणारे आणि ६) स्वदेशात व जगात आध्यात्मिक मूल्यांवर आधारित समाज संस्थापना करण्याचे ध्येय सर्वांसमोर ठेवणारे आहेत. या सहा पैलूंद्वारे राष्ट्रीय संस्कृतीची जीवनदायी तत्त्वे लक्षात येतात.

Patriot Saints of India
Samarth Ramdas, Maharshi Dayanand
Swami Vivekanand, Yogi Aurobindo

# ज्ञान प्रबोधिनी

– संकल्पना उगम



**सिंहगडावर 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' पुस्तकाचे लेखन**

१९५२ मध्ये ती. आप्पा पेंडसे यांनी पुण्याजवळ सिंहगडावर मुक्काम केला होता. तेथे 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' या चरित्रग्रंथाचे त्यांनी लेखन केले.

**स्वतंत्र भारतासमोर असलेल्या प्रश्नांचा अभ्यास डॉ. पेंडसे यांनी केला. या सर्व प्रश्नांच्या मुळाशी लोकशिक्षण आणि लोकसंघटनेचा प्रश्न आहे, असे त्यांना आढळून आले. या मूलभूत प्रश्नाची सोडवणूक करायचा मार्ग त्यांना सापडला, तो नेतृत्वशिक्षण आणि नेतृत्व घडण या संकल्पनेमध्ये !**

In 1952, Appa Pendse wrote a biography of Swami Vivekananda - the patriot saint of India. The thoughts therein were the foundation of Jnana Prabodhini, established in 1962.

# ज्ञान प्रबोधिनी

## – नेतृत्व विकसन हा मार्ग



१९५४ साली एका अखिल भारतीय निबंधस्पर्धेत डॉ. पेंडसे यांच्या 'नेतृत्वविकसनाचे मार्ग' या निबंधाला प्रथम पारितोषिक मिळाले. पुढच्या काळातही 'नेतृत्वविकसन' हाच डॉ. पेंडसे आणि त्यांच्या बरोबरीच्या तरुण सहकाऱ्यांच्या चिंतनाचा आणि अभ्यासाचा विषय होता.

जुलै १९६२ मध्ये काही शिक्षण तज्ज्ञांची सभा होऊन ८ ऑगस्ट ६२ रोजी 'ज्ञान प्रबोधिनी' नावाच्या शिक्षण संस्थेची स्थापना झाली.

१९६२ ते १९६९ या काळात संध्याकाळचे तीन तास 'प्रबोधशाळा' चालत असे. त्यात विविध शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांमधून बुद्धिमान मुलांची निवड करून त्यांच्यासाठी खेळ, क्रमिक अभ्यासाचे तास आणि देशस्थितीचा अभ्यास असा दैनंदिन कार्यक्रम असे. त्याशिवाय अनेकविध उपक्रमांची जोड



त्यास मिळत होती. ती. आप्पांच्या सहवासात विचार आणि कृती या दोन्हींमुळे पहिल्या काही तुकड्यांमधील विद्यार्थ्यांची जडणघडण वैशिष्ट्यपूर्ण झाली.



"अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते " हे ध्येयवाक्य ठरले. विज्ञानाने इहलोकावर विजय संपादन करावा आणि आत्मज्ञानाने अमृतत्वाची प्राप्ती करून घ्यावी, हा मूलभूत तत्त्वविचार म्हणजे प्रबोधिनीचा पाया आहे.

"Through Science transcend the limitations of physical nature, through Knowledge of Reality transcend the limitations of mental and spiritual nature, and thus enjoy Eternal Bliss".

# ज्ञान प्रबोधिनीचे पदाधिकारी

## अध्यक्ष


श्री. मो. ग. कोटिभास्कर (१९६२-६६)


श्री. शंतनुराव ल. किर्लोस्कर (१९६६-८१)


डॉ.. पांडुरंग वा. सुखात्मे (१९८१-१९९३)


डॉ. वसंतराव गोवारीकर (१९९३ पासून)

## उपाध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १) एस. एम. जोशी | १९६२-७५ | ६) श्री. वसंतराव श्री. वैद्य | १९८१-९३ |
| २) श्री. दयानंद वा. बांदोडकर | १९६२-७३ | ७) श्री. सत्यप्रकाश खोसला | १९८४-९३ |
| ३) रँग्लर. ग. स. महाजनी | १९७५-८४ | ८) श्री. अ. श्री. वाडदेकर | १९८७-९३ |
| ४) श्री. कांतीसेन श्रॉफ | १९७५-८१ | ९) श्री. अण्णा हजारे | १९९३ पासून |
| ५) श्री. नंदलालजी पित्ती | १९८१-८६ | १०) श्रीमती अनु आगा | १९९६-२००२ |

## सन्मान्य सदस्य

१) डॉ. रघुनाथ माशेलकर २) डॉ. जयंत नारळीकर

३) डॉ. भालचंद्र उद्गावकर

## कार्याध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १) डॉ. वा. कृ. कोठुरकर | १९६२-६६ | ३) डॉ. मा. रा. भिडे | १९८१-८६ |
| २) श्री. वसंतराव श्री. वैद्य | १९६६-८१ | ४) न्या. बा. न. देशमुख | १९८७-२००३ |

५) श्री. प्र. ल. गावडे २००३ पासून

## उपकार्याध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| १) डॉ. मा. वि. भाजेकर | १९६२-६८ | ५) श्री. बा. रा. पंडित | १९८४-९१ |
| २) श्री. वि. पां. बोकील | १९६८-७५ | ६) श्री. वि. वि. चिपळूणकर | १९९१-१९९३ |
| ३) डॉ. भा. के. सोहोनी | १९७५-८१ | ७) श्री. प्र. ल. गावडे | १९९३-२००३ |
| ४) श्री. म. श्री. वर्तक | १९८१-८४ | ८) श्री. पद्माकर दुभाषी | २००३ पासून |

## संचालक

१) वा. वि. वि. तथा आप्पा पेंडसे १९६६-८३ २) वा. व. सी. तथा अण्णा ताम्हनकर १९८३-८९

३) वा. गिरीश श्री. बापट १९८९ पासून

## ज्येष्ठ कार्यवाह

१) प्रा. यशवंतराव शं. लेले

२) प्रा. वामनराव ना. अभ्यंकर

३) वा. उषाताई खिरे (संशोधन संस्था)

४) वा. स्वर्णलता भिशीकर (ज्ञा. प्र. सोलापूर)

## Office Bearers of Jnana Prabodhini

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# मनुष्य घडणीचे शिक्षण



माणसातील दिव्यत्वाचे
प्रकटीकरण म्हणजे धर्म
आणि
माणसातील पूर्णत्वाचे
प्रकटीकरण म्हणजे शिक्षण

– स्वामी विवेकानंद

'आत्मनो मोक्षार्थं जगद्हिताय च'
राष्ट्र निर्माणासाठी मनुष्य घडण

'Man-making
for
Nation Building'

शिक्षण



मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले, पूजिले ।

Education is the manifestation
of perfection already in man

*- Swami Vivekanand*

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# शिक्षणाचे अधिष्ठान

शिक्षण

## संस्कार

- ‘अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ’
- ‘अद्वैत तत्त्वज्ञान’ हा शिक्षणाचा पाया
- चारित्र्य निर्मितीसाठी नीती आणि मूल्ये रुजवणारे शैक्षणिक जीवन

‘मातृ-पितृ-आचार्य देवो भव’

‘सत्यं वद’

‘स्वाध्यायात् मा प्रमदः’

‘धर्मं चर’

‘राष्ट्र देवो भव’











•Spirituality is the foundation.
•Meditation and rituals modified to suit modern times.

# व्यक्तिविकासाची बहुभुजाकृती

## पंचकोशाधारित भारतीय संकल्पना




**कौशल्य विकसन**

**प्रेरणा जागरण**

**वृत्ती घडण**

**राष्ट्रहिताविषयी आस्था, राष्ट्रीय प्रश्नांविषयी जाण व ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रेरणा**

All-round development of Personality

- Skill Development
- Motivation Building
- Attitude Formation

# व्यक्तिविकासाची बहुभुजाकृती

सद्गुरू सेवा

इंद्रिय संयमन

युक्ताहार विहार

दैनंदिन उपासना

स्वाध्याय प्रवचन



दैनंदिन उपासना – निगडी

राष्ट्र-अर्चना



Daily *Upasana* (Meditation) & Vow of Studentship

# शिक्षणप्रणालीतील प्रमुख घटक

नावीन्यपूर्ण, कालोचित, सर्वंकष शिक्षणप्रणाली
ज्ञान प्रबोधिनीच्या प्रदीर्घ अनुभवांतून
प्रयोगसिद्ध झालेली शिक्षणपद्धती

**माध्यमिक शिक्षणासाठीच्या**
**शिक्षणप्रणालीतले प्रमुख घटक**






Six major components of
educational pedagogy at Jnana Prabodhini

# वैशिष्ट्यपूर्ण अध्ययन-अध्यापन पद्धती

एकाच छत्राखाली – क्रमिक शिक्षण, संघटनेतील शिक्षण, समाज विकसनाचे शिक्षण, संशोधन व उद्योजकतेचे शिक्षण

दर्शन – आव्हान – सहभागातून प्रतिसाद

Exposure - Challenge - Response by Participation

- अध्ययनातील स्वायत्तता
- सर्जनशीलता व मुक्त प्रयोगांना स्वातंत्र्य आणि उत्तेजन
- सखोल अभ्यासाचा आणि संशोधनाचा आग्रह
- अनुभवातून अध्ययन
- सहवास प्रधान गुरुकुल



# वैशिष्ट्यपूर्ण अध्ययन-अध्यापन पद्धती

ज्ञान निर्मितीसाठी आंतरशाखीय अभ्यास

ज्ञानाच्या उपयोजनासाठी बहुशाखीय अभ्यास

ज्ञान निर्मिती व ज्ञानाचे उपयोजन हे अध्ययन – अध्यापनाचे दिशादर्शक सूत्र

आशय प्रधान शिक्षणापेक्षा, कौशल्य आणि प्रक्रिया प्रधान शिक्षणाला महत्त्व

- शिक्षकांचा सहवास
- शिक्षकांबरोबर काम
- शिक्षकांच्या कृतीचे निरीक्षण
- शिक्षकांच्या ध्येयदर्शनातून प्रेरणा



स्वयंअध्ययन




शालेय स्पर्धा परीक्षा



सहाध्याय भेटी

# सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन

शिक्षण

## प्राणिक विकसन



१) श्वासाचे निरीक्षण

२) शरीरातील अंतर्गत हालचालींकडे लक्ष

३) शारीरिक कौशल्यांचा अभ्यास



ध्यान – पुणे



योगासने – निगडी



सूर्य नमस्कार – निगडी



कला–अभिव्यक्ती, पुणे



प्रार्थना – पुणे

Vital energy studied and strengthened by Breathing exercises, Yogasanas, Meditation

# सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन

## शिक्षणाचा प्रारंभ – शरीराचा परिचय

## शारीरिक विकसन

*शरीर सतेज-सुंदर*

## समतोल शारीरिक विकसनाचे पैलू

- स्नायुबल
- वेग व चपळता
- लवचिकता व तोल
- रग आणि दम
- स्नायू व ज्ञानेंद्रिये यांचा समन्वय
- सुदृढता व काटकता
- विविध परिस्थितींमध्ये टिकून राहण्याची क्षमता
- निरोगीपणा व रोग प्रतिकारक क्षमता
- कार्यक्षमता



साहस सहल (गिरिभ्रमण) – पुणे



सायकल सहल – निगडी





बर्चीनृत्य – पुणे



पारितोषिके – निगडी



क्रीडा प्रात्यक्षिके – पुणे

शिक्षण

*काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल, नांदतो केवळ पांडुरंग !*

Physical Development ensured in different ways

# सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन

## मानसिक विकसन

शुद्ध भाव
स्व-संवाद
गुणसुमने ही वेचू या
विधायक दृष्टिकोन
मनाची प्रसन्नता
मनाची विशालता
चांगल्या सवयींची शक्ती
इंद्रिय संयमन




शिक्षण

मन गुरु आणि शिष्य, करी आपुलेचि दास्य ।
प्रसन्न आपआपणास, गति अथवा अधोगति ।।

५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

Psychological Development
through enriching experiences

# सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन

शिक्षण



## बुद्धीचे शतपैलू

- चौकस निरीक्षण
- साक्षेपी आकलन
- अचूक स्मरण
- गणिती तर्क
- नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा
- कल्पक समस्या परिहार
- विवेकी निर्णय

## बौद्धिक विकसन

*बुद्धि दे रघुनायका*
*– समर्थ रामदास*



मौनाभ्यास



समस्या परिहार



दृक्श्राव्य – निरीक्षण



प्रकल्प



विज्ञान शिबिर

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास–यत्ने । बनो शुद्ध बुद्धी हि तेजस्विनी ।।

५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

**Intellectual development based on research on 120 factors of Intelligence**

# सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसन



- 'स्व' जाणीव – 'स्व' ची ओळख
- 'मी' चे विस्तारणारे वर्तुळ
- जनी जनार्दन ऐसा भाव
- मी विराटाचा वारस
- विश्वशक्तीची उपासना

## आत्मिक विकसन

*चिदानंदरूपी शिव मी शिव मी ।*



.विद्याव्रत समारंभ



.विद्याव्रत



वर्षारंभ



दैनंदिन उपासना

धियो यो नः प्रचोदयात् ।

Spiritual development
Vow of studentship in 8th std.
Upasana (meditation) : means for auto-suggestion

# नेतृत्व गुणांचे संवर्धन






उद्योजकता विकास



गटकार्य

Leadership qualities development through various activities

# नेतृत्व गुणांचे संवर्धन

शिक्षण

- युवक व युवती दले
- प्रशासन, उद्योग व्यवसाय, समाजकार्य या क्षेत्रात प्रभावी कार्यकर्ते – नेते प्रशिक्षित करणे
- गट बैठकी, पथक पद्धती, विस्तार शिबिरे यासारखी तंत्रे



उद्योजकता विकास

समाजाच्या प्रश्नांना थेट भिडणारे, प्रश्नांची उकल करून योग्य उत्तर शोधणारे, नेतृत्व गुणांचा विकास करणारे शिक्षण



शिबिरे

- अग्रणी योजना
- वेळ व साधने यांचे कुशल नियोजन
- इतरांचे सहकार्य, सामूहिक बुद्धिमत्तेचा उपयोग
- उद्दिष्टपूर्तीसाठी व्यूहरचना
- उपक्रमांचे नियोजन व कार्यवाही

Leadership qualities development
Entrepreneurship & community problem-solving

# राष्ट्रीयत्वाचे शिक्षण



सुरक्षा दलाबरोबर संवाद



कथाकथन



मातृभूमी पूजन




ईशान्य भारत
मैत्री

पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ,
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।

Imbibing national spirit
& building bridges of friendship across states

# राष्ट्रीयत्वाचे शिक्षण

- भारतीय परंपरेचा सार्थ अभिमान
- स्वीकारशील स्वदेशी बाणा
- देशस्थितीची आस्था
- देशसेवेच्या मार्गाचा शोध





राष्ट्रीय गीतगायन


वंचितांच्या शिक्षणात सहभाग


काश्मिरी लोकांशी संवाद

Learning about national heritage
& problems of national integration

# सामाजिक जाणिवेचा विकास











Understanding problems of rural communities

# सामाजिक जाणिवेचा विकास

आजूबाजूच्या समाजाच्या अस्तित्वाचे भान
समाजातील लोकांच्या भावना, गरजा, अपेक्षा, स्वप्ने यांची जाणीव
विविध समाजगटांच्या प्रगतीचे वा अगतिकतेचे आकलन
अनुभूती घेण्याची इच्छा, इतरांच्या प्रगतीमुळे आनंद मानण्याची व
इतरांचे प्रश्न आपले मानून ते सोडवण्याला प्रवृत्त होण्याची तयारी




न त्वहं कामये राज्यं, न स्वर्गं नापुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानां प्राणिनाम् आर्तिनाशनम् ।।

Social awareness, Social action, Social commitment

# नातेसंबंधांची निर्मिती

- प्रेम–सुरक्षितता–आत्मीयतापूर्ण वातावरण
- लवचिक कार्यपद्धती
- परस्पर पूरकता
- सहविचार
- समुपदेशन
- कल्याण मित्रांचा (mentors) सहवास
- निरंतर शिक्षण


अध्यापक शिबिरे


समुपदेशन / मार्गदर्शन





प्रकट कार्यक्रम


सेतुबंधन मेळावा


मेळावे हराळी

शिक्षण

Relationship Building
Teachers, Parents, and other Sympathisers

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे



*बुद्धिमान विद्यार्थ्यांची शाळा*
*नेतृत्व विकसन*
*विशेष उद्दिष्टांसाठी चालवलेली शाळा*

स्थापना वर्ष – १९६९
संलग्नता – केंद्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न
माध्यम – ५वी ते १०वी इंग्रजी माध्यमाची शाळा
विद्यार्थी संख्या – ४८०







- *बुद्धिमान विद्यार्थ्यांमधील नेतृत्व गुणांचे विकसन*
- *सामाजिक परिवर्तनासाठी बुद्धिमत्तेला प्रेरणा*
- *समाजातील विभिन्न स्तरांतील विविध प्रकारची बुद्धिमत्ता शोधून अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर*
- *मुख्य प्रवाहातील शाळांमधून आवृत्ती होण्यासारख्या शैक्षणिक प्रयोगांवर संशोधन*

Jnana Prabodhini Prashala, Pune
A school for intellectually gifted students

# ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी

## शिक्षण

- उद्यम नगरीतील गरजांना अनुरूप तंत्रशिक्षण
- संगणक शिक्षण
- जैव तंत्रज्ञान प्रयोगशाळा
- गुरुकुल
- क्रीडाकुल
- मुक्तिसोपान संगीत प्रकल्प







स्थापना – १९८१
संलग्नता – महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाशी संलग्न
माध्यम – शिशु वर्ग ते १०वी मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा
विद्यार्थी संख्या – २६००



- परिसरातील लोकसमूहाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक गरजा ओळखून त्याच्या विकासाला चालना देणारे केन्द्र
- पिंपरी–चिंचवड परिसरातील शैक्षणिक नेतृत्व करणारा समर्थ प्रकल्प
- महाराष्ट्रभरातील विविध शैक्षणिक संस्थांचे अनेक पदरी जाळे उभारणारा बहुआयामी प्रकल्प
- रूढ औपचारिक शिक्षणात पंचकोशाधारित व्यक्तिमत्त्व विकसनासाठी गुरुकुल, क्रीडा क्षेत्रातील उत्तमतेसाठी क्रीडाकुल यांची विशेष रचना

**Jnana Prabodhini Navanagar Vidyalaya, Nigadi**
Educational & Cultural centre in the new industrial township

# ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी














## Jnana Prabodhini Navanagar Vidyalaya, Nigadi

Multifarious activities in the Lead School of Nigadi area

# ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर

शिक्षण



- शिशु शिक्षणाची प्रदीर्घ, समृद्ध परंपरा
- किशोर व कुमारवयीन शैक्षणिक प्रयोगांची शिशु व बाल शिक्षणात भर
- बाल संस्कार केंद्रांद्वारे शिशु शिक्षणातील संस्कारांचा व्यापक प्रमाणावरील प्रयोग
- शिशु अध्यापिका महाविद्यालयाद्वारे सोलापूरच्या शिशुशिक्षणात विधायक परिवर्तन

स्थापना – १९८९
संलग्नता – महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाशी संलग्न
माध्यम – शिशु वर्ग ते १०वी मराठी माध्यमाची शाळा
विद्यार्थी संख्या –१०००









## Jnana Prabodhini Balvikas Mandir, Solapur

Setting standards of excellence in pre-primary education

# ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे

शिक्षण





व्यवसाय शिक्षण

स्थापना – १९९१

संलग्नता – महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाशी संलग्न

माध्यम – ५वी ते १०वी मराठी माध्यमाची शाळा

विद्यार्थी संख्या – २७५



पवनामाईचा उत्सव

- **ग्रामीण भागातील व्यक्ती तेथून विस्थापित होऊ नये यासाठी तिच्या उचित शिक्षणाचा स्रोत**
- **अशा व्यक्तींच्या द्वारे ग्रामीण भागात परिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देणारा ऊर्जा स्रोत**
- **व्यवसाय शिक्षण, आधुनिक शेती, पशुपालन, आरोग्य शिक्षण व गावाच्या विकासासाठीचा प्रेरणा स्रोत**
- **रोटरी क्लब (पुणे-उत्तर), ग्रामस्थ-साळुंब्रे व ज्ञान प्रबोधिनी-पुणे यांचा संयुक्त उपक्रम**

५० ग्राम प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

## Gram Prabodhini Vidyalaya, Salumbre

School as a centre for village development

# ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे

शिक्षण

## मी गावाचा
## गाव माझा



नदीस्वच्छतेची प्रतिज्ञा



वृक्षारोपण



हरितगृह शेती



पशुपालन प्रकल्प

५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

## Gram Prabodhini Vidyalaya, Salumbre

A joint initiative of Rotary Club of Poona North,
villagers of Salumbre & Jnana Prabodhini, Pune

शिक्षण

# ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी



स्थापना वर्ष – १९९४
संलग्नता – महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाशी संलग्न
माध्यम – १ली ते १०वी मराठी माध्यमाची शाळा
विद्यार्थी संख्या – ४००

- नैसर्गिक आपत्ती क्षेत्रात मदत कार्याच्या पलीकडे जाऊन दीर्घकालीन विकास योजनांचे केंद्र
- मराठवाड्यातील कृषी आणि व्यावसायिक प्रशिक्षणाचा प्रकल्प
- परिसरातील महिलांच्या शक्ती जागरणाचे कार्यक्रम
- दुष्काळी प्रदेशातील जमीन-पाणी-ऊर्जा या संसाधनांच्या समुचित वापराचे प्रात्यक्षिक





प्रबोधन





सौर ऊर्जा



गोमसंयंत्र

## Jnana Prabodhini Vidyalaya, Harali

Dist - Osmanabad

Educational reconstruction in earth-quake hit area

# ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी

शिक्षण

आर्थिक स्वावलंबनासाठी फळशेती व प्रक्रिया उद्योग



फळ प्रक्रिया



पाण्याचा सुनियोजित वापर



फळशेती



गांडूळखत



फळशेती



रोपवाटिका

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

## Jnana Prabodhini Vidyalaya, Harali

Dist - Osmanabad

Horticulture & Fruit-processing for self-sufficiency

## दिल्ली येथे 'एक्सलन्स ॲवार्ड' स्वीकारताना





- 'इंडियन सेंटर फॉर एन्करेजिंग एक्सलन्स' या मुंबईच्या संस्थेतर्फे १९७५ मध्ये एक्सलन्स ॲवार्ड
- उपराष्ट्रपती श्री. बसवण्णा जत्ती यांच्या दिल्लीतील निवासस्थानी १५० ख्यातनाम व्यक्तींच्या उपस्थितीत प्रदान
- 'रूप पालटू देशाचे' अशी शपथ घेतलेले किमान २०० कर्तृत्वसंपन्न युवक आणि युवती ज्ञान प्रबोधिनी देशाला देऊ इच्छिते.
  – मानपत्राला वा. आप्पा पेंडसे यांचे उत्तर

"We want to dedicate to our country at least 200 young boys and girls who are determined to change the face of India" - Dr. Appa Pendse

# अनौपचारिक शिक्षण

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीत केवळ पाठ्यपुस्तकांचे शिक्षण अभिप्रेत नाही. अनेक अनौपचारिक माध्यमांमधून विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याचे काम प्रबोधिनी करते. शालेय विद्यार्थ्यांसाठी ''छात्र प्रबोधन''सारखे मासिक आहे. १०० दिवसांच्या शाळेचा प्रयोग शिक्षक आणि विद्यार्थी मिळून चालवितात.

ग्रामीण भागातील बुद्धिमान विद्यार्थी शोधून त्यांचे अनौपचारिक उपक्रम 'ग्रामीण प्रज्ञा विकास'नावाने घेण्यापासून ते ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी साखर कारखान्यावरच 'साखर शाळा' चालविण्याचाही प्रयोग आहे.

तांत्रिक–व्यावसायिक शिक्षणाची प्रबोधिनीची काही ठिकाणी केंद्रे आहेत. विविध अनौपचारिक उपक्रम कसे घ्यावेत, यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण करणारे केंद्र आहे. त्यात व्हिडिओ–कॉन्फरन्सिंग तंत्राचाही वापर केला जातो.

असे काम झाले पाहिजे, अशी प्रेरणा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात जागृत होण्यासाठी 'प्रचीती' नावाचा कार्यगट आहे. तेथपासून प्रशासन सेवेमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनाचे 'स्पर्धा परीक्षा केंद्र'आहे.

विविध वयोगटांसाठीचे अनौपचारिक शिक्षण व्यक्तिविकसनासाठी तर आहेच, पण त्याचबरोबरीने समाजासाठी झटण्याची वृत्तिघडण व्हावी, असाही हेतू यातून साध्य होतो.

The process of man-making education is not limited to text-book curricula.Informal ways and means have been devised to cater to the needs of students spread at various places. Motivation building and Attitude Formation are the main objectives.

# कृषितांत्रिक विद्यालय - शिवापूर



विद्युत जोडणीचे प्रात्यक्षिक

स्थापना

- महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची मान्यता
- तांत्रिक शिक्षण व उद्योजकतेचे प्रशिक्षण
- अभ्यासक्रम : टर्निंग, फिटिंग, वेल्डिंग, वायरमन इ. तंत्रकौशल्यांचे कृतीशिक्षण



रोटरी क्लब पुणे मिडटाऊन यांच्याकडून सी.एन.सी. लेथ व मिलिंग मशीनची देणगी. आधुनिक तंत्रशिक्षणाचा प्रारंभ

वेल्डिंग चे प्रशिक्षण



विद्यालय च्या वास्तूची प्रतिकृती पाहताना मा. अण्णा हजारे, प्राचार्य यशवंतराव जेठे

**Vocational education centre at Shivapur has created employability in rural youngsters and prevented migration to some extent.**

# छात्र प्रबोधन - पुणे

प्रारंभ शके १९१४ / इ. स. १९९२

ज्ञान प्रबोधिनीच्या
शैक्षणिक व संघटनात्मक
कार्याच्या
**विस्ताराचे**
**प्रभावी माध्यम**



इवली शल्ये रुपती खुपती
मात करूदे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

**कुमारांसाठी कृतिशीलता**
**जोपासणारे मासिक !**

पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे

## मासिक



निव्वळ मासिक नव्हे....
विद्यार्थ्यांच्या
**सर्वांगीण**
**विकसनाची चळवळ**

## प्रकाशने



**(महाराष्ट्रभर)**
**विस्तार**
**उपक्रम**





Magazine... Publications... Enriching Activities... Widespread Outreach
A Magazine for Youngsters which triggers Action and nurtures Creativity.
— Not just a Magazine, a Movement for Development of Youngsters.

# छात्र प्रबोधन - पुणे

## दिवाळी अंक व प्रकाशने

वीस वर्षांची उत्साहवर्धक, वर्धिष्णू वाटचाल
शके १९१४ ते १९३४/इ.स.१९९२ ते २०१२

## मासिक



- आज अखेर वार्षिक सभासद- ३०,०००
- सध्या ३००० सभासद
- २४० अंकांद्वारे १२००० पाने प्रकाशित
- ३५ विषय, २२५ उपविषय, २५ लेखमाला
- १२५ लेखक व २५ चित्रकारांचे नित्य योगदान
- साहस, जिद्द, इतिहास, मैत्री, प्रकल्प, विज्ञान इ. एकूण १५ विशेषांक प्रकाशित

## दिवाळी अंक



- मराठी, इंग्रजी, हिंदी, ग्रामीण,युवोन्मेष, संगणकीय,ब्रेल, बोलका इ. आवृत्त्या
- उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून १२ संस्थांतर्फे, एकूण १५ पुरस्कार.
- सातत्याने ५ वर्षं ४० हजार अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी
- ११० ठिकाणी स्थानिक केंद्रांद्वारा जलद वितरण

### दिवाळी भेट



## प्रकाशने

- छात्र प्रबोधनच्या साहित्यातून २८ पुस्तके प्रकाशित
- प्रबोधिनीची शैक्षणिक व वैचारिक ३० पुस्तके आणि ३ सीडी/डी.व्ही.डी. प्रकाशित
- १३ पुस्तकांच्या ५००० पेक्षा अधिक प्रतींची विक्री
- एकूण १,७५,००० प्रतींची विक्री.

A Zestful, Progressive Journey of Two Decades.
A Flourishing, Massive Endeavour with Humongous Readership, Prize-winning Diwali Issues and Publications in good demand.

# छात्र प्रबोधन – पुणे

## स्पर्धा, शिबिरे, विस्तार



सृजनाला पंख नवे – स्पर्धा

### स्पर्धा – अभियाने

- १८ कल्पक स्पर्धांचे आयोजन
- १२००० विद्यार्थ्यांचा सहभाग
- कॉपी विरोधी, भारतीय लिपीतून स्वाक्षरी
- प्रगतिवीरांना बक्षिसे व वाचनवृद्धी
- ही अभियाने सातत्याने राबविली

### सभासदांसाठी विविधांगी उपक्रम

**मेळावे** (६०) – दिवाळी अंकाभोवती ग्रामीण मेळावे

**शिबिरे** (५३)– ग्रामीण परिचय, नेतृत्व, युवा, संयोजकप्रशिक्षण

**सहली** (३२)– गिरिभ्रमण, सायकल, प्रबोधिनी परिचय, अभ्यास शिबिरे–सहली या निवासी उपक्रमांमध्ये २००० कुमार, ४०० युवा, ५५० प्रौढ सदस्य सहभागी.

सभासदांना वाढदिवसाची हस्तलिखित शुभेच्छापत्रे

विद्यार्थ्यांच्या लेखक–संपादक मंडळातून दरवर्षी विद्यार्थी विशेषांकाची निर्मिती

अनुभव समृद्ध करणारी जोडीकार्ये




तुम्हीच व्हा संपादक...– स्पर्धा





### विस्तार

- सातत्याने १० वर्षे महाराष्ट्र व गोवा मिळून शंभरहून अधिक गावांमध्ये स्वयंस्फूर्तपणे ४०० कार्यकर्त्यांद्वारा वितरण केंद्रे
- ४० गावांमध्ये एकदा शिबिरे,१० गावांमधे ३ वर्षांहून अधिक काळ नियमित उपक्रम
- बोरिवली, डोंबिवली व सांगली केंद्रांचे प्रबोधिनीच्या विस्तार केंद्रांत रूपांतर

A Movement that nourishes Potentials of Youngsters through Creative Competitions, Multi-Dimensional Activities and Widespread Network.

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# छात्र प्रबोधन - पुणे

## कुमार महोत्सव, अभ्यास दौरा

### तपपूर्ती - उसळत्या उत्साहाचा आविष्कार

शके १९२२ - २३ / इ. स. २००४ - ०५

**३० गावांमध्ये कुमार मेळावे,**
**४ ठिकाणी कुमार सम्मेलने**
(एकूण २५०० विद्यार्थी)



### 'सृजनाला पंख नवे'

छात्र प्रबोधन अंकातील साहित्यावर आधारित
सादरीकरणाची राज्यस्तरीय स्पर्धा,
१०७ संघ व १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग

### कुमार महोत्सव

५७ गावांमधून १७०० विद्यार्थी-कार्यकर्ते सहभागी
कलारसास्वाद, क्रीडाप्रात्यक्षिके, विज्ञान प्रदर्शन,
प्रकट मुलाखती, लेखकांशी गप्पा, अनुभवकथन,
पद्यगायन इ. भरगच्च कार्यक्रमांनी
२ दिवसांचा संस्मरणीय महोत्सव



### प्रकाशने

तपपूर्ती विशेषांक व
अंकातील साहित्यातून १२ पुस्तके प्रकाशित

### ईशान्य भारत अभ्यास व मैत्री दौरा

२०० युवक-युवतींचा
(७ गटांमध्ये, सातही राज्यांमध्ये, प्रत्येकी १६ दिवसांचा)



'Tapapurti' - An Eventful 12th Year
An Outstanding Expression of Bubbling Enthusiasm through
Get-togethers, Gatherings, State Level Competition, Memorable Festival,
North-East Study Tour and 12 Publications.

# छात्र प्रबोधन - पुणे

५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

## आगामी संकल्प

पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे

## दशवार्षिक भवितव्य लेख

शके १९३४ ते १९४४ / इ. स. २०१२ ते २०२२

## ध्येयविधान

**कुमार व युवकांच्या सर्वांगीण विकसनासाठी मासिक व मासिकाभोवतीचे उपक्रम प्रभावीपणे विकसित करणे.**

## ठळक संकल्प

- ग्रामीण, इंग्रजी व युवोन्मेष अंकाच्या मासिक आवृत्ती प्रकाशित करणे.
- पाच प्रादेशिक भाषांतील दिवाळी अंक प्रकाशित करणे.
- ई-माध्यमाद्वारा कुमारांशी क्रियाशील संवादासाठी रचना कार्यान्वित करणे.
- औपचारिक व अनौपचारिक शिक्षणप्रक्रियेत मासिकाचा वापर करण्याचे नमुने उभे करणे व प्रशिक्षण कार्यशाळा घेणे.
- महाराष्ट्र व गोवा येथील प्रत्येक तालुक्यात वितरण केंद्रे (सुमारे ३००) उभारणे

## आवाहन

- सभासद संख्या वाढीसाठी पुढाकार
- प्रकाशनांचा प्रसार व विक्री
- प्रबोधन तासिकांचे संयोजन
- अंकातील साहित्यात योगदान
- आर्थिक योगदान
- विस्तार कार्यात योगदान

यांसाठी आपला वेळ, अनुभव, तज्ज्ञता, संपर्क, अर्थबळ या सर्वांचे मनापासून स्वागत !
छात्र प्रबोधनद्वारा विद्यार्थ्यांच्या विकसनाच्या चळवळीला त्यामुळे नक्कीच गती मिळेल.

Chhatra Prabodhan, Jnana Prabodhini
510 Sadashiv Peth, Pune - 30 Ph.: 020-24207175

chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
www.chhatraprabodhan.org

A Prospective Venture for the Coming Decade.
Striving for Creating an Enriched Educational Atmosphere through Magazine and Activities with Your whole-hearted Involvement.

५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# स्पर्धा परीक्षा केंद्र - पुणे

शिक्षण

**भारतीय प्रशासनामध्ये स्वच्छ, कार्यक्षम व लोकाभिमुख अधिकारी तयार व्हावेत, या उद्देशाने १९९५ मध्ये स्थापना**

## प्रशिक्षण

- विविध स्पर्धा–परीक्षांसाठी मार्गदर्शन केंद्र आणि त्याबरोबरच युवा पिढीतील भावी अधिकारी–वर्गासाठी व्यक्तिमत्त्व विकसन केंद्र
- प्रशिक्षणवर्ग असलेल्या स्पर्धा–परीक्षा :

१. केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC)

२. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (MPSC)

३. राज्यात काही ठिकाणी शिक्षक प्रशिक्षण शिबिरे

**मुख्य भर केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC)**
**पूर्व–परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत यांच्या प्रशिक्षणावर भर**


यशस्वी विद्यार्थ्यांचा वार्षिक समारंभ


मुलाखत परीक्षेचा सराव

विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनावर भर

१. वृत्ती घडण– दैनंदिन प्रार्थना, साप्ताहिक उपासना, अभ्यास दौरे, क्षेत्रभेटी, अधिकारी भेटी, वैयक्तिक मार्गदर्शन व संपर्क, तसेच विद्यार्थ्यांशी– अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवण्यासाठी "संवाद" नावाचे अनियतकालिक

२. ज्ञान– व्याख्याने, वादविवाद, अधिकारी मुलाखती इ.

३. कौशल्य प्रशिक्षण– अभ्यास पद्धती, नियोजन, स्वयं मूल्यमापन, प्रश्नमंजूषा इ.


मा. आण्णा हजारे यांच्याशी राळेगणसिद्धी येथे भेट


अध्यापकांसह साप्ताहिक उपासना

**Competitive Examinations Centre for UPSC and MPSC Exams**

# स्पर्धा परीक्षांसाठी त्रिस्तरीय प्रशिक्षण - पुणे

शिक्षण




ले.ज़नरल शेकटकर (निवृत्त) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

**१. स्व-परिचय**

**(Know Your Self)**
वैयक्तिक तसेच सामूहिक स्तरांवर मार्गदर्शन आणि समुपदेशन



**२. यंत्रणा-परिचय**

**(Know Your System)**
ग्राम अभ्यास, ग्रामसभा अनुभव, तहसीलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालय भेटी- प्रकल्प, माजी विद्यार्थी- अधिकारी अनुभवकथन इ.



**३. समाज-परिचय**

**(Know Your Society)**
भटके - विमुक्त विद्यार्थी मार्गदर्शन, आदिवासी तसेच वंचित गटांसाठी काम करणाऱ्या संस्थांना आणि विविध भौगोलिक प्रदेशांना भेटी, अभ्यासदौरे

५० ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

Three pillars of education
Know Your Self, Know Your System, Know Your Society

# शैक्षणिक उपक्रम प्रशिक्षण केंद्र - पुणे

**नावीन्यपूर्ण कालोचित प्रयोगसिद्ध**
**शिक्षणप्रणालीच्या प्रसारासाठी**

शिक्षण

**शैक्षणिक साधन घर**

- अध्ययन – अध्यापन साहित्य निर्मिती आणि वापर
- ई–साधनांची निर्मिती व वापर

**बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र**

समाज परिवर्तनासाठी
बुद्धि-गुणांचा विकास





**वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र**

समृद्ध शिक्षणातून समर्थ भारत: वर्ग



रूप पालटू शिक्षणाचे: प्रशिक्षण वर्ग



Email - erc@jnanaprabodhini.org
Visit us at : www.erc–pune.org
Contact : (020) 24207194, 24207000

Educational Activity Training Centre
A resource centre for innovative methods of learning

## वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र - पुणे

# समृद्ध शिक्षणातून समर्थ भारत प्रकल्प

शिक्षण

### प्रशिक्षणाची क्षेत्रे

**अध्यापन प्रक्रिया**

- स्वयंअध्ययन कौशल्ये
- प्रकल्प पद्धतीतून शिक्षण
- कौशल्य प्रशिक्षण
- क्षमताधिष्ठित अध्ययन-अध्यापन

**व्यक्तिमत्त्व विकास**

- नियोजन कौशल्य
- संप्रेषण कौशल्य
- मार्गदर्शन व समपुदेशन
- नेतृत्वगुणांचे संवर्धन
- शालेय वातावरण निर्मिती

**आशय समृद्धी**

- संबोध अध्यापन
- अध्यापनाची तंत्रे, साधने
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर
- राष्ट्रीयत्वाचे शिक्षण





**विशेष वर्ग :-**

- गतिवाचन
- स्वयंअध्ययन कौशल्य
- प्रकल्प पद्धती
- तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अध्यापन
- प्रतिभा विकसन
- राष्ट्रीयत्वाचे शिक्षण

### प्रशिक्षणाचे स्तर

- परिचयवर्ग (१ दिवस)
- पायाभूत वर्ग (३ दिवस)
- प्रगत वर्ग (६ दिवस)
- शालेय गुणवत्ता विकास आराखडा (५ वर्षे)



**A Teacher's Training centre for enriched education in other schools from Maharashtra and other states of India**

# बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र - पुणे

शिक्षण

## समाज परिवर्तनासाठी बुद्धिगुणांचा विकास

### बुद्धिविकासाला चालना देणारे उपक्रम

**कार्यशाळा**

- विज्ञान खेळणी
- भौमितिक प्रतिकृती
- प्रतिभाशाली लेखन
- स्वयंअध्ययन कौशल्य
- वाचन कौशल्य

**स्पर्धा**

- प्रकल्प स्पर्धा
- समस्या परिहार स्पर्धा




**राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा मार्गदर्शन**




**शैक्षणिक साधन घर**

ई–साधनांची निर्मिती आणि प्रसार

१) आधुनिक काळाला सुसंगत अशा ई–अध्ययन साहित्याची निर्मिती
२) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि वेबकास्टिंगद्वारे ई–अध्ययन वर्ग
३) भारतात सर्वदूर गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रसारासाठी संकेत स्थळ

Visit us at : www.erc-pune.org

आपण आपले शैक्षणिक साहित्य upload व download करू शकता

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी मोफत सुविधा

Talent development centre works for identification and nurturance of gifted pupils from various organizations. Modern technology is used for reaching them

# प्रचीती - पुणे

शिक्षण

**समाज परिवर्तनासाठी १९९० पासून युवक वयोगटातील संघटन**




शासकीय अभियांत्रिकी, स. प., गरवारे, बी. जे. मेडिकल महाविद्यालयांत विशेष संघटन



**शिवप्रदेश, धडगाव, गडचिरोली भागांत विकास कार्य**

**विशिष्ट देश-प्रश्नांवर कार्य**

- गंगोत्री: जल-कृषी-ऊर्जा

विज्ञानाश्रम: शिक्षण-ग्रामविकसन



**हाती घेतलेले विशेष कार्यक्रम**

- साखरशाळा: १९९२ ते २००८
- ग्रामीण प्रज्ञा विकास: १९९६ ते १९९८
- शिवप्रदेश: १९९२ पासून
- स्पर्धा परीक्षा केंद्र: १९९५ पासून



Youth Organisation with “Development is the philosophy”.
Youngsters undertook many challenges in their social careers

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# ग्रामीण प्रज्ञा विकास प्रकल्प

शिक्षण



ज्ञान प्रबोधिनीतील विद्यार्थी विकासासाठी उपयुक्त ठरलेल्या शिक्षण पद्धती आणि उपक्रमांचा ग्रामीण भागात लाभ होण्यासाठी कार्यक्रम (१९९३ पासून)



पुणे जिल्ह्यातील ७ तालुके, रत्नागिरी, सोलापूर, अंबाजोगाई इत्यादी १२-१५ केंद्रांवर कार्यक्रम केंद्रे



Jnana Prabodhini's informal educational programme for identification & nurturance of rural talent

# साखरशाळा

शिक्षण










साखरशाळेची कल्पना, रायगड जिल्ह्यात पडसरे येथे ज्ञान प्रबोधिनीने चालवलेल्या आदिवासी मुलांसाठीच्या १०० दिवसांच्या शाळेतून जन्मास आली.

**साखरशाळा**

ऊसतोडणीसाठी हंगामी (दसरा ते होळी) स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांतील मुलांसाठी १०० दिवसांची "साखरशाळा".

सहभागी कारखाने: २६

विद्यार्थी संख्या: ३६००

**साखरशाळा शिक्षक प्रशिक्षण**

२००१ मध्ये 'ज्ञान प्रबोधिनी', 'लोकविकास संस्था', 'सेव्ह द चिल्ड्रेन, कॅनडा' यांच्या संयुक्त प्रयत्नांनी 'युनिसेफच्या' मदतीने 'साखरशाळा कक्ष' सुरु

सध्या हंगामी शाळा चालवणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन करण्याचे काम ज्ञान प्रबोधिनीकडे आहे.

Pioneering work in promoting "Sugar Schools" of 100 days duration in Maharashtra, during the crushing season of sugar factories. At our behest Govt. issued a GR to factories to provide infrastructure for such schools

# संशोधन प्रभाग - पुणे

संशोधन

- प्रज्ञा मानस संशोधिका



- आयुर्वेद संशोधिका
- संस्कृत संस्कृति संशोधिका

## संशोधनाची आवश्यकता

"आम्हाला व्यक्तिविकासाचे, संघटनेचे, ग्रामविकसनाचे, समाज–संस्थापनेचे, राष्ट्रघडणीचे, नेतृत्व–विकसनाचे, प्रेरणा–जागरणाचे आणि उपासनेचेही शास्त्र करायचे आहे."

Jnana Prabodhini Samshodhan Sanstha -
Sister Organization of Jnana Prabodhini
dedicated to the cause of research in diverse fields

# प्रज्ञा मानस संशोधिका


डॉ. उषाताई खिरे विभागाची माहिती देताना

- शिक्षणाला संशोधनाचाही आधार असावा म्हणून प्रारंभ – १९७०
- संशोधन संस्था स्थापना – १९७८
- शासकीय मान्यता केंद्रीय विज्ञान आणि प्रौद्योगिकी मंत्रालय (Department of Science and Technology, Government of India), विश्वविद्यालय अनुदान आयोग (UGC), महाराष्ट्र राज्य शिक्षण संचलनालय, व पुणे विद्यापीठ

फुलब्राईट शिष्यवृत्ती प्राप्ती, परिषदा, अधिवेशने, कार्यशाळा यामध्ये सहभाग व संशोधन निबंध सादरीकरण, 'मेन्सा' या आंतरराष्ट्रीय संघटनेचे राष्ट्रीय मानसशास्त्रीय पर्यवेक्षक संस्था (National Supervisory Psychologist)

**बुद्धिमापन** – डॉ. जे. पी. गिलफोर्ड यांच्या प्रतिमानानुसार बुद्धीच्या १२० पैलूंसाठी भारतीय कसोट्यांची निर्मिती, 'रॅकिट' या डच कसोटीचे भारतीय अनुकूलन, बुद्धिमंतांचे अनुधावन, वाचकौशल्य, प्रतिभा–विकसन, निर्णयक्षमता, समग्र मेधाविकास, सामाजिक प्रज्ञा–विकास, ग्रामीण महिलांची विचारपद्धती, 'शिशु प्रज्ञा प्रकल्प', विद्यावाचस्पती पदवी मार्गदर्शकांसाठी प्रबंध मूल्यमापन व मार्गदर्शन



Structure of Inteligence (SOI)

संशोधन

Jnana Prabodhini's Institute of Psychology (JPIP)
A wing of Jnana Prabodhini Samshodhan Sanstha (JPSS)

# मानसशास्त्रीय संशोधन

**मुख्य उद्दिष्ट : सर्व वयोगटातील मूलभूत मानवी क्षमतांचा शोध, त्यांचे मापन व संवर्धन**

## महत्त्वाची संशोधन क्षेत्रे व नमुन्याचे प्रकल्प



- गिलफोर्ड प्रारूपावरील १२० चाचण्या
- प्रज्ञावंतांचे मानसशास्त्र (पाठपुरावा, अनुधावन)
- बाल व युवा विकास प्रकल्प
- संघटनात्मक स्त्री नेतृत्व
- समाजाचे मानसशास्त्र (सांप्रदायिक दंगलींचा परिणाम)
- भारतीय योगशास्त्राचा कामावर व जीवनाच्या गुणवत्तेवर प्रभाव
- मानसिक आरोग्य (भावनिक बुद्धिमत्ता व वैवाहिक समाधान)
- शालेय मानसशास्त्र (शालेय वातावरणाचा बुद्धिमान व अन्य मुलांवरील परिणाम)



- १९७५ ते २०१२ – या काळात २१ प्रदीर्घ व ४८ लघु संशोधन प्रकल्पांची पूर्तता
- विद्यावाचस्पती संशोधनात २० प्रबंधांची पूर्तता, ८ संशोधने चालू
- UGC, NCERT, ICSSR, TET या नामवंत संस्थांचे संशोधन अनुदान प्राप्त
- अनेक संस्थांसमवेत संयुक्त प्रकल्प (उदा. कैवल्यधाम, दृष्टी, स्त्री अध्ययन – संशोधन केंद्र)
- गुणात्मक संशोधन पद्धतींचाही प्रभावी वापर
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये प्रज्ञा मानस संशोधिकेच्या ५० संशोधन निबंधांचे सादरीकरण



Research in various areas of Psychology – Educational, Social, Indian, Organizational

# औद्योगिक मानव संसाधन सेवा



**भारतातील अनेक औद्योगिक कंपन्यांना उमेदवार निवडीसाठी व सेवांतर्गत मूल्यमापनासाठी साहाय्य**

| कंपनीचा प्रकार | चाचणी काम कंपनी संख्या (मानसशास्त्रीय) |
|---|---|
| मोटार कंपनी | २० |
| साबण कंपनी | ०५ |
| औषध निर्माण | ०४ |
| पवन उर्जा | ०१ |
| तेलक्षेत्र | ०१ |
| उपभोक्ता क्षेत्र | ०२ |
| ट्रॅक्टर | ०१ |
| अन्न व कृषी | ०२ |

- **वातावरण सर्वेक्षण व यथार्थता अभ्यास – ३ कंपन्यांमध्ये**
- **विविध प्रशिक्षण सेवा – ३ कंपन्यांमध्ये**
- **कामगार स्तरावर चाचणीकाम व प्रशिक्षण देणारी भारतातील अग्रगण्य संस्था**



Premier Institute for Testing and Training of Industrial Labour.
Use of psychological tests for candidate selection.

# व्यक्तिमत्त्व चाचण्या व आलेख

आजपर्यंत २०० हून अधिक
मापन साधनांचा विकास,
व्यक्तिगत शोधिका , कौटुंबिक
समायोजन, शालेय समायोजन,
सामाजिक जाणीव,
सत्त्व–रज–तम या भावनिक
क्षमतांचे मापन,
वैवाहिक जीवन समाधान



**बुद्धिमत्ता चाचण्या –**

डॉ. जे.पी. गिलफोर्ड यांच्या प्रज्ञा प्रारूपावर आधारित १२० चाचण्यांची कसोटीमाला – ३० आकृतीरूप, ३० चिह्नरूप, ३० आशयरूप, ३० वर्तनरूप, भारतीय बाल प्रज्ञा कसोटी, शिशु प्रज्ञा कसोटी, गणित प्रज्ञा कसोटी, मानसपट , अंक प्रज्ञा कसोटी, स्मरण कसोटी, प्रज्ञा कसोटी (सर्वसामान्य क्षमता), निर्णय क्षमता कसोटी, वैद्यकीय अभिप्राय मापन

**अभिक्षमता मापन (१० वी ते १२ वी)**

व्यावसायिक प्रगतीचा अंदाज (पदवीधर तसेच पदव्युत्तर स्तरावरील कामे)

**वैशिष्ट्ये –**

संशोधनाच्या भक्कम पायावर आधारित मानवाच्या सर्व पैलूंचे मापन
क्षमता, अभिक्षमता, व्यक्तिमत्त्व इ. सर्व महत्त्वाचे पैलू समाविष्ट
प्रत्येक वयोगटासाठी अभिक्षमता मापन चाचणी उपलब्ध : बालकांपासून ते प्रौढांपर्यंत उपलब्ध
मुख्यत्वे मराठी व इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध
इतर भाषा – हिंदी, कन्नड, तमिळ, तेलुगु व गुजराथी
भारतीय ग्रामीण व शहरी प्रदत्तांवर प्रमाणित



संशोधन

Personality tests and profile
used for career counselling & in-service promotion

# निरंतर विकास प्रशिक्षणे

**(प्रशिक्षित मानसतज्ज्ञांमार्फत विविध वयोगटांसाठी दिली जाणारी प्रशिक्षणे)**
**पुणे, डोंबिवली, बोरीवली, रत्नागिरी, औरंगाबाद, सोलापूर, हेमलकसा, कराड येथे प्रशिक्षण वर्ग**

**बालविकास –**

**वयोगट – ७ ते १५ वर्षे**

१) सर्वांगीण बालविकास शिबिरे
२) निरंतर बालविकास उपक्रम
३) क्षमता संवर्धन





**हेतू –** संशोधनसिद्ध बौद्धिक खेळ, गटकार्ये, प्रकल्प, प्रत्यक्ष अनुभव यांच्या माध्यमातून मुलांच्या विविध प्रकारच्या बुद्धिमत्तांना चालना
आजवर १०,००० हून अधिक मुले सहभागी

**बालविकास प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा**
**हेतू –** बालविकास चळवळीमध्ये अनेकांचा डोळस सहभाग वाढविणे

**सुजाण पालकत्व कार्यशाळा** (पुणे, सोलापूर, शिरूर, शेगाव, कराड, गोवा, तळेगाव, सकाळ एन.आय.ई.)
**हेतू –** मूल वाढविणे ही एक आनंददायी प्रक्रिया होण्यासाठीचे सजग व सुजाण पालकत्व विकसित होणे. आजवर १५०० हून अधिक पालक सहभागी

**शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा** (पुणे, भारतीय जैन संघटना, बीड जिल्हा)
**हेतू –** औपचारिक शिक्षण पद्धतींबरोबरच अनौपचारिक शिक्षण पद्धतींचा वापर करून मुलांच्या विकासातील सहभाग वाढविणे. शिक्षकांमध्ये मानसशास्त्रीय दृष्टिकोन विकसित करणे

संशोधन

Training programmes for continuous development of children as well as parents, teachers and facilitators.

# मानसशास्त्रातील अभ्यासक्रम

मानसशास्त्राचा दैनंदिन जीवनात अधिकाधिक वापर व्हावा यासाठी उपयोजित अभ्यासक्रम निर्मिती व संचालन करणे



**<u>दीर्घ अभ्यासक्रम</u>**

१९९३ ते २०१० –
पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त असा वार्षिक 'शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम' य़शस्वीरित्या संचालित

'२०००'... बाल व किशोरवयीन मुलांच्या विकास व क्षमता संवर्धन, स्वायत्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम (मुख्यतः पत्रद्वारा – सहा महिने)



**<u>लघु अभ्यासक्रम</u>**

- १९९८ – ९९
सुजाण पालकत्व अभ्यासक्रम (३ महिने)
- २०१२ – समृद्ध नातेसंबंधांतून मानसिक स्वास्थ्याची जोपासना (३ महिने)

**विषयाधिष्ठित लघु कार्यशाळा / अभ्यासक्रम**

- संशोधन पद्धती (७ दिवस)
- आनंदाची शोधयात्रा – विवेकनिष्ठ विचार (७ दिवस)
- मनोमापन तंत्रे व पद्धती (२ ते ७ दिवस)



संशोधन

Training Workshops in psychology for teachers,
Training courses of varying durations for psychologists

# संस्कृत-संस्कृति-संशोधिका (संत्रिका)

संशोधन

**स्थापना – २२ जुलै १९७५**

**उपविभाग –** १.संशोधन २.पौरोहित्य उपक्रम ३.जनतंत्र उद्‌बोधन मंच





**उद्दिष्टे –**
१. संस्कृत भाषा आणि संस्कृतीचे संवर्धन
२. अभ्यासपूर्ण संशोधन
३. राष्ट्रीयत्वाची जागृती आणि भारतीय एकात्मतेची जोपासना

*अभ्यास व संशोधनासाठी सुसज्ज ग्रंथालय*



*३३ भाषा व १८ लिप्यांमधील वैशिष्ट्यपूर्ण रामायण संग्रह*

A research wing in Sanskrit and Culture was started in 1975. A library of selective books and scripts includes a treasure of Ramayanas.

# संशोधन - संत्रिका

## आजवरचे काही प्रातिनिधिक संशोधन प्रकल्प

१. प्राचीन भारतीय द्यूत

२. गरूड पुराणोक्त आयुर्विज्ञान

३. Engineering Geometry of Yajna Kundas and Yajna Mandapas

४. Earthquakes - Ref. from Rigveda to Rajtarangini

५. भारतीय शासनाने अधिकृतरीत्या अंगिकारलेल्या राष्ट्रीय सौर कालगणनेचा प्रचार करण्यासाठी दर वर्षी राष्ट्रीय सौर दिनदर्शिका प्रकाशित







## आजपर्यंत झालेले विविध अभ्यासवर्ग

१. अभिजात संस्कृत वाङ्मय

२. बंगाली भाषा

३. वास्तुशास्त्र

४. पौरोहित्य – इ.स. १९९० पासून दरवर्षी

**संस्कृतीच्या विविध संकल्पनांच्या आधारे समाज प्रबोधनासाठी सुमारे २५० व्याख्याने**

Research projects and publications on Health issues in Garud Purana,Geometry of Yajna-Kundas and references on Earthquakes in ancient scriptures.

# पौरोहित्य उपक्रम - संत्रिका

संशोधन

प्रबोधिनीने नामकरण, विवाह व अंत्येष्टी या कौटुंबिक व शैक्षणिक संस्कारांच्या पुनर्रचित पोथ्या तयार केल्या आहेत. सोळा संस्कारांमध्ये नसलेल्या षष्ट्यब्दिपूर्ती व एकोद्दिष्ट श्राद्ध (मरणोत्तर अकराव्या ते तेराव्या दिवसांचे विधी) या पारंपरिक संस्कारांच्या पोथ्या सुद्धा केल्या आहेत. देहदानाच्या आधुनिक पद्धतीसाठी नवी पोथी रचली आहे.
या पोथ्या वापरून अनेक कुटुंबांमधून संस्कार व्हायला सुरुवात झाली आहे. सुटसुटीत,कमी खर्चिक अशा व्यावहारिक कारणांसाठी आज याचा जास्त प्रसार होत असला तरी या पोथ्यांमधील अर्थवाहीपणा मुख्यतः उपस्थितांना भावतो.

## हेतू – धार्मिक संस्कारांची कालानुरूप अर्थपूर्ण मांडणी

या कामाला हिंदू धर्मातील सुधारणांसंबंधीची १०० वर्षांची परंपरा

१. तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद – १९३४
२. धर्म-निर्णय मंडळ – १९३८
३. ज्ञान प्रबोधिनी
पौरोहित्य विभाग – १९९०



## ज्ञान प्रबोधिनी पौरोहित्याची वैशिष्ट्ये

१. मंत्रांच्या अर्थासह संस्कार
२. विविध कृतींमागील वैज्ञानिक स्पष्टीकरण
३. सर्वांचा सहभाग
४. शिस्तबद्धता
५. परंपरेने नाकारलेल्या अनेकांना पौरोहित्य व यजमानपदाचा अधिकार





The role of 'Purohit' of Jnana Prabodhini is to acquaint the performers of religious rites with the method and meaning of 'Sanskar' & scripts.

# पौरोहित्य उपक्रम - संत्रिका

## वैशिष्ट्ये व भावी योजना

संशोधन

**इतिहास -** १. गेली सुमारे ४० वर्षे समाजात ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने धार्मिक संस्कार

२. इ. स. १९९० पासून सर्व जाति-जमातीतील स्त्री-पुरुषांसाठी पुण्यात पौरोहित्य वर्ग सुरू.





### सद्य:स्थिती

एकूण संस्कार पोथ्या - २१ (मराठी, हिंदी, इंग्रजी)

पुरोहित संख्या - स्त्रिया - १९ , पुरुष - ११

महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर ही संस्कार केले जातात

ज्ञान प्रबोधिनी पौरोहित्याच्या वैशिष्ट्यांची प्रसारमाध्यमांकडून विशेष दखल



गणेशप्रतिष्ठापना व लक्ष्मीपूजन पोथ्या वेबसाईटवर उपलब्ध

http://www.santrika.org

### भावी योजना

१. पुण्याबाहेर नियमित पौरोहित्य वर्ग घेणे

२. परदेशात संस्कार करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

३. अन्य भाषांमध्ये पोथ्या प्रकाशित करणे.

Men or women from any caste can learn to become a Purohit. The reformed rites have been performed in all over India & foreign countries also.

# जनतंत्र - उद्बोधन - मंच

## (पूर्वीचे राष्ट्रवाद अभ्यास मंडळ)

संशोधन

**हेतू –** प्राचीन व आधुनिक मूल्यांच्या आधारे देशप्रश्नांवर विचारमंथन व राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करणे

**ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांसाठी आणि अन्य जिज्ञासूंसाठी खुले व्यासपीठ**

**इतिहास व सद्यःस्थिती –** प्रारंभ १९९५ पासून
आत्तापर्यंत सुमारे २०० मासिक व्याख्याने व चर्चासत्रे यांचे नियोजन

**प्रमुख विषय –** राष्ट्रवाद, हिंदू – मुस्लिम संबंध, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा, इहवाद, समकालीन घटना, सवर्ण–सवर्णेतर संबंध, इ.





**भावी योजना**

१. विशेष अभ्यास गट सुरू करणे.
२. दिवसभराची विशेष चर्चासत्रे घेणे.
३. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे.
४. राष्ट्रीय पातळीवरील चिंतन गटाची निर्मिती.

This forum is a concrete step towards building bridges across socio-economic or religious denominations.

# आयुर्वेद संशोधिका

आयुर्वेद औषधी संशोधिकेत प्राचीन आयुर्वेदीय औषधे सूक्ष्म स्वरूपाच्या औषधांप्रमाणे १९७६ पासून तयार केली जातात. त्यांचे गुणधर्म पडताळून पाहिले जात. ही औषधे असलेला आजीबाईचा बटवा (नेहमीच्या वापरातील आयुर्वेद औषधांचा संच) महाराष्ट्रात आणि अन्य प्रांतांतही झपाट्याने लोकप्रिय झाली. १९७६ पासून १०० औषधी वनस्पतींपासून वेगवेगळ्या व्याधींकरिता सूक्ष्मौषधी तयार झाल्या.



बॅ. आप्पासाहेब पंत व मा. रत्नाप्पा अण्णा कुंभार यांची भेट

आयुर्वेदिक औषधी संशोधिकेत आयुर्वेद व आधुनिक वैद्यक यांचा योग्य समन्वय करण्यासाठी संशोधन झाले.

- **घरगुती औषधे तयार करण्यासाठी प्रशिक्षण वर्ग**
- **खेळाडूंना विशेष मार्गदर्शन**
- **वृक्षआयुर्वेदावर संशोधन व प्रकाशन**

संशोधन

Research in Ayurvedic Medicines
Handy for use even in rural areas

# केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या (DST) साहाय्याने झालेले प्रकल्प

संशोधन

## खतकोश



Fertilizer Encyclopedia
खतांचा जगातील पहिला कोश
संपादक: डॉ. वसंतराव गोवारीकर (अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी) व अन्य
(१९९८ – २००५ )
डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते प्रकाशन



डॉ. गिरीश बापट (संचालक, ज्ञान प्रबोधिनी) कोशाची प्रत डॉ. अब्दुल कलामांना भेट देताना

Pesticide Encyclopedia (प्रकाशनाच्या मार्गावर)
कीटकनाशकांचा जगातील पहिला कोश
संपादक: डॉ. वसंतराव गोवारीकर व अन्य (२००६–२०१२)

A prestigeous project administered by Jnana Prabodhini. Dr. Vasant Gowariker - former Secretary of DST and Scientific Advisor to the Prime Minister, headed the Project.

# ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था

आरोग्य

**संजीवन रुग्णालय**

- वैद्यकीय क्षेत्रामध्ये संघटना करून उत्तम, निष्ठापूर्ण आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी......
- वैद्यकीय क्षेत्रातील प्रबोधिनीच्या विद्यार्थी–कार्यकर्त्यांचा न्यास १९९३ मध्ये स्थापन
- १ ऑगस्ट १९९४ रोजी तत्कालीन पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयींच्या हस्ते उद्घाटन. महाराष्ट्र टेक्निकल सोसायटीचे हे रुग्णालय व्यवस्थापनासाठी १६ वर्षे ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्थेकडे होते.




**वैशिष्ट्ये**

- उत्तम दर्जाची, नैतिकतेवर आधारित आणि विचारपूर्वक केलेली वैद्यकीय सेवा
- ॲलोपथी, होमिओपथी आणि आयुर्वेद उपचार पद्धती एका ठिकाणी उपलब्ध
- आरोग्य शिक्षण आणि रोगप्रतिबंध यांचा ग्रामीण लोकांना अधिकाधिक लाभ

**कमला मेहता नेत्र रुग्णालय**



शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा

**स्थापना** – १९९७

**उद्देश** – ग्रामीण भागात वेळेवर, उत्तम आणि वाजवी दरात नेत्रसेवा देणे

**केंद्रे** – शिरवळ, शिवापूर, भोर, भुईंज

- आजवर २१,००० जणांना लाभ
- १०,००० पेक्षा अधिक मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया
- विशेष सेवा वृद्ध, औद्योगिक वसाहतीतील कामगार
- शालेय विद्यार्थ्यांमधील नेत्रदोष चिकित्सा शिबिरे

**दीनानाथ रुग्णालय**

लता मंगेशकर फौंडेशन च्या दीनानाथ रुग्णालयाचे व्यवस्थापन प्रारंभापासून प्रबोधिनीकडे



Doctors from alumni group formed Jnana Prabodhini Medical Trust in 1993. Managed Sanjeevan Hospital for 16 years. Run Eye Hospital at Shirwal from 1997. Also contribute in Erection and Management of Deenath Hospital

# कुष्ठरोग निवारण

## आरोग्य




ग्रामीण विकासाचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे आरोग्य.
'इमॉस' या स्विस संस्थेच्या साहाय्याने शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यांतील आणि कात्रज घाटाच्या अलीकडची काही गावे अशा एकूण २३६ खेड्यांमध्ये प्रबोधिनीने कुष्ठरोग निवारण आणि सर्वंकष आरोग्य योजना २२ वर्षे चालविली.





त्यात क्षयरोग निवारण कार्याचीही भर घातली.
महाराष्ट्र शासनाने या भागातील कुष्ठरोग निवारणाचे दायित्व प्रबोधिनीकडे सोपविले.
एस.ई.टी. म्हणजे सर्व्हे, एज्युकेशन आणि ट्रीटमेंट ही कुष्ठनिवारणाची कार्यपद्धती आहे.





खेड्यापाड्यातून आरोग्य प्रबोधन करण्यासाठी स्थानिक स्त्री-पुरुषांना आरोग्य शिक्षण
आरोग्य प्रबोधक शिबिरे



त्यात प्रशिक्षित झालेल्या १५० प्रबोधकांपैकी काही स्त्री-पुरुष आपापल्या गावी आरोग्य केंद्रे चालवितात.

कुष्ठरोगाचे प्रमाण या कार्यक्षेत्रात मान्य निकषांच्या खाली उतरवण्यात यश आल्याने प्रकल्पाची सांगता

Leprosy to be cured at home, was the approach.
A long and successful project in
236 villages of Pune District.

# ग्रामविकसन संकल्पना

ग्रामविकसन

हो उदंड येथे नीतिमंत श्रीमंती
या घराघरांतुन वसो क्षेम-सुख शान्ती
आनंदवने भुवने उभवू या येथे
या संकल्पासह पदे रोविली पहिली
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली !

श्रम उद्योगांचे कल्पतरू फुलवावे
हे स्फुरण येथुनी दिशान्तराला जावे
शिवभूमि सुजला सुफला व्हावी म्हणुनी
ही शपथकंकणे आज करी बान्धियली
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली !



## ज्ञान प्रबोधिनीची ग्रामविकास – संकल्पना

१. सर्वंकष योजना
२. गावांतून स्थलांतरावर प्रतिबंध
३. आध्यात्मिक जीवनदृष्टी
४. आधुनिक मूल्यांची पेरणी
५. स्वावलंबन हा मुख्य हेतू, बाहेरून अर्थसाहाय्य वर्ज्य नाही
६. तरूण गावकरी व नवोदित स्त्री–नेतृत्वावर भिस्त
७. पक्षीय राजकारणापासून अलिप्तता. सर्वांशी संवाद
८. सर्वांच्या लाभाचे उपक्रम
९. प्रेरणा प्रबोधिनीची – सहभाग लोकांचा
१०. पुढील बदलाची प्रेरणा गावातून – साहाय्य प्रबोधिनीचे

एकजीव उमदे व्हावे जनजीवन गावोगावी ।
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ।।

More than half of India lives in rural areas.
10 principles are important in Prabodhini's concept of Rural Development.

# पाणलोट क्षेत्र विकास



मा. अण्णासाहेब हजारे यांची भेट

## पाणलोट कार्यक्रमाची रचना

नदी खोरे हे विकासाचे एकक मानून शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यात काम (ता. भोर व वेल्हे, जि. पुणे)



वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण

## पाणलोट कार्यक्रमातील प्रबोधिनीचे वेगळेपण

- एकूण कार्यक्रमाच्या खर्चाच्या १०% लोकवर्गणी मिळवण्यासाठी कसोशीने प्रयत्न.
- जमीन सपाटीकरण व शेतबांध दुरुस्ती यासारखी कामे ५०% लोकवर्गणीतून यशस्वीरित्या पूर्ण.
- प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांचे व पुण्यातील आय. टी. कंपन्यांचे झरे विकास कार्यक्रमात सातत्यपूर्ण आर्थिक योगदान.



श्रमदानातून झरे विकास कार्यक्रम

ग्रामविकसन

- Awarness building meetings for watershed programmes
- Spring development through community participation

# पाणलोट क्षेत्र विकास




**पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम**

- दिवसेंदिवस खालावत जाणारी भूजलाची पातळी वाढविण्यासाठी
- गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी

## जल संधारण




Watershed development activities in the Shivganga river valley through CAPART, New Delhi



माती बंधारा



**<u>पाणलोटातील उपचारपद्धती</u>**

**<u>मृद संधारण :</u>**

यात प्रामुख्याने जमिनीची होणारी धूप थांबविण्यासाठी डोंगर उतारावर विविध उपचार केले जातात. अनघड दगडी बांध (Loose Boulder Structure) हा अशा उपचाराचा एक प्रकार आहे

नाल्यामध्ये अनघड दगडांना जाळी बांधून गॅबियन बंधारे बांधले गेले.

# सौर ऊर्जा प्रसार कार्यक्रम

## सौर ऊर्जा वापराचा उपयोग

रॉकेलच्या दिव्याला सक्षम, आधुनिक व
पर्यावरणपूरक असा आकर्षक पर्याय



सौर दिवे



## उपक्रमाचा विस्तार

महाराष्ट्रात यवतमाळ, चंद्रपूर,
लातूर व कोल्हापूर येथे तेथील
संस्थांच्या पुढाकारातून प्रसार





ग्रामस्थांमध्ये प्रचार





घरातील वापर

ग्रामविकसन

The rising sun of tomorrow : Solar Lamps
in hamlets with blessings of
an industrialist from Mumbai

# शिवगंगा खोऱ्यात यंत्रयुगाचा प्रारंभ

ग्रामविकसन





शिवगंगा व गुंजवणी खोऱ्यांतील
ग्राम विकासाचे प्रयोग.
स्थलांतर थांबवण्यासाठी शेती व उद्योग या
दोन्हींवर भर आवश्यक





लोंढणपूरच्या श्री. गुलाब
कांबळेच्या कारखान्याचे
उद्घाटनः हस्ते मा. शंतनुराव किर्लोस्कर.

१९७३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांची यंत्रशाळेस भेट
कामावर प्रभावित होऊन शिवापूरची १० एकरची जागा प्रबोधिनीला शासनाने दिली



टेल्कोचे श्री. सुमन्त मुळगावकर यांची
यंत्रशाळेच्या प्रदर्शनास भेट

The machine age was taken to Shivaganga Valley by Jnana Prabodhini by starting a Training-cum-Production workshop at Shivapur in 1971

# कोटिभास्कर स्मृति उद्योग

## यंत्रशाळा, शिवापूर

ग्रामविकसन



१९६१ ते १९९७ – १५०० हून अधिक युवकांना तंत्रशिक्षण व उत्पादन कौशल्याचे प्रशिक्षण

एकावेळी साधारण २०० जणांना रोजगार



शिवगंगा नदीच्या परिसरातील पहिला मोठा उद्योग

५० लि.पी. च्या परिवार लघुउद्योग सुरू होण्यास चालना

५० हून अधिक उद्योजक निर्माण झाले.

आसपासच्या परिसरातील अधिक तरुणांना रोजगार





**कारखान्यातील कामगार** हे प्रबोधिनीचे त्या त्या गावातील प्रतिनिधी:

त्यांच्याकरवी गावांमध्ये विकास कामांची सुरुवात

काहीजण ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून निवडून आले व त्यांनी विकासकामे केली.





About 50 local youngsters started their own enterprises because of the training given in Yantrashala, Shivapur

ग्रामविकसन

## Prabodhan Capacitors

आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दिशेने प्रबोधिनीने सुरू केलेला प्रशिक्षण व उत्पादन उद्योग

- १९६९ : फॅन आणि इलेक्ट्रिक मोटरसाठी
- १९७२ : पॉवर कपॅसिटर्स मोठ्या विद्युत वितरण यंत्रणांसाठी
- दरमहा ६००० KVAR पर्यंत उत्पादन





धारकांची चाचणी

१९७३ – ७४ मध्ये वार्षिक उलाढाल १२ लक्ष रुपयांपर्यंत.

१९७५ पासून गुजरात, पंजाब, हरियाणा, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडु इलेक्ट्रिसिटी बोर्डांना नियमित पुरवठा

वार्षिक उलाढाल काही कोटींमध्ये



व्हॅक्युम इम्प्रीग्रेशन प्लांट

- बडोदा, दिल्ली आणि बंगलोर येथे क्षेत्रीय कार्यालये
- भारतभर वितरणाचे जाळे
- ISI हा गुणवत्तेचा निकष प्राप्त राज्य शासनाचे विशेष शिफारसपत्र
- १९८४ मध्ये प्रबोधन ब्रँडचे खाजगीकरण



पॉवर कपॅसिटर्स बँक

**Training - cum - Production:**
**Training for Entrepreneurship - Production for Self-sufficiency**

# शिवभूमि खांडसरी उद्योग
# करंजावणे, ता. वेल्हे, जि. पुणे

## ग्रामविकसन

गुंजवणी खोऱ्याच्या सर्वांगीण विकासासाठी व कृषितांत्रिक विद्यालयासाठी आर्थिक स्रोत हवा म्हणून १९७७ मध्ये उभारणी

- *गुणवत्तापूर्ण खांडसरी साखरेचे उत्पादन*
- *१५० जणांना रोजगार*



- १९७८ – ७९ मध्ये केंद्र शासनाने साखर धोरणात मोठे बदल केल्यामुळे महाराष्ट्रातील खांडसरी उद्योग जवळ जवळ संपुष्टात
- १९८५ मध्ये कारखान्याची विक्री
- खोरे विकसनाचे अनेक उपक्रम मात्र पुढे यशस्वी. नसरापूर ते वेल्हे रस्ता दुरुस्त, या भागातील पहिले दूरभाष केंद्र (telephone exchange) प्रबोधिनीच्या प्रयत्नांतून सुरू चापेट धरण आणि गुंजवणी नदीवरील १३ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे यांना चालना त्या आधारे राजगड सहकारी साखर कारखान्याची वाढ

## प्रबोधन उद्‌वाहक

ज्ञान प्रबोधिनीत स्वावलंबनाचा आग्रह – आपल्या वास्तूतील उद्वाहक (Lift) आपणच का बांधू नये? या विचारातून अभियंते विद्यार्थी तंत्रज्ञान शिकले. उद्वाहक उभारणीचा व देखभालीचा परवाना मिळवून, शिवापूरच्या यंत्रशाळेत योग्य त्या भागांचे उत्पादन करून पुण्यातील वास्तूतील उद्वाहक तयार केला



- ५ उद्वाहकांच्या निर्मितीचा आणि २० उद्वाहकांच्या देखभालीचा परवाना
- २००७ मध्ये या उद्योगाचे खाजगीकरण
- नंतर २० उद्वाहकांच्या निर्मितीचा आणि १०० – १५० उद्वाहकांच्या देखभालीचा परवाना

**Agro-based industry for rural development and Self-sufficiency of Agro-technical school**

# तंत्रशिक्षणातील भरारी

ग्रामविकसन

## सोल्डरिंग स्कूल



- १९८४ : दोन जणांनी विक्रम साराभाई अवकाश केंद्र–त्रिवेंद्रम् येथे प्रगत शिक्षणाचा अनुभव घेतला.
- **जानेवारी १९८५** : सोल्डरिंग स्कूल प्रारंभ. वरील केंद्राकडून प्रबोधिनीला सोल्डरिंगची विशेष साधने व अवजारे भेट सन २००० पर्यंत ६१ वर्गात ४३४ जणांना प्रशिक्षण दिले

- प्रशिक्षणाच्या शेवटी चाचणी घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ज्ञान प्रबोधिनीचे प्रशस्तिपत्रक देण्यात आले. त्यास विक्रम साराभाई अवकाश केंद्राची मान्यता होती.
- आत्तापर्यंत वर्गांमध्ये पुण्यातील इलेक्ट्रॉनिक्स उद्योग समूहांचा विशेष सहभाग. त्यामध्ये भारत इलेक्ट्रॉनिक्स, इंटरनॅशनल कॉम्प्युटर्स, अल्ट्रामॅटिक्स, डिजिट्रॉनिक्स तसेच बजाज ऑटो व थर्मेक्स इ. कंपन्यांकडून प्रशिक्षणार्थी आले.

## विद्युत् अणु संशोधिका

१९७० च्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स मधील तंत्रज्ञानावर आधारित उपकरणांचे उत्पादन व विक्री

- मुंबईतील प्रसिद्ध नेते स. का. पाटील यांच्या देणगीतून विभागास १९७५ मध्ये प्रारंभ
- व्होल्टेज स्टॅबिलायझर्स, आर्. पी. एम्. काउंटर्स व अन्य उपकरणांच्या संशोधन व उत्पादनात माजी विद्यार्थ्यांचा सहभाग
- या विभागाची कल्पना विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांमधून येते





## क्षणमाप विभाग

- पाषाण येथील ए.आर.डी.ई. या केंद्रशासनाच्या संरक्षणविषयक संशोधन प्रयोगशाळेसाठी 'क्षणमाप' (टायमर) या उपकरणाची निर्मिती – १९७४ ते ८८.
- पूर्वी आयात कराव्या लागणाऱ्या या तंत्रज्ञानास भारतीय पर्याय विकसित करण्याचे श्रेय प्रबोधिनीस.
- अत्यंत गुंतागुंतीची रचना असणारे 'क्षणमाप' सीमेवरती आपल्या जवानांना स्फोटकांपासून संरक्षण देण्याचे काम करतात.
- या जोखमीच्या संशोधनाचे काम प्रबोधिनीच्या अभियंत्यांनी पूर्ण केले व क्षणमापांच्या कार्यक्षमतेची तपासणी करण्यासाठी केंद्रोत्सारी यंत्र (सेंट्रिफ्युगल मशिन) विकसित केले.

Training-cum-Production wings using advanced technologies were run for 'Space Quality' Soldering, S. K. Patil Institute of Electronics and Mechanical Timers for ARDE.

# संवादिनी

## स्त्री शक्ती प्रबोधनाची चळवळ

संघटन

'स्वयं विकासातून समाज परिवर्तनाकडे' हे ध्येय
गेली १२ वर्ष अनेक उपक्रम करणारा सुशिक्षित महिलांचा गट
, उमलत्या वयाशी जुळवून घेतांना, मैत्र, बहर जोपासतांना,
सहजीवनाच्या उंबरठ्यावर अशा कार्यशाळा.

### समतोल द्वैमासिक

१९९७ मध्ये त्रैमासिकाच्या रुपात सुरुवात

आता 'द्वैमासिक' म्हणून प्रसिद्ध प्रत्येक अंक एका सूत्रविषयावर आधारित उदा. गाजलेले वाद, शोध, प्रकाशाची बेटे इ.

सलग दोन वर्षे 'रोटरी लोकमान्य' पुरस्कार





### स्वयंविकासासाठी मासिक बैठक

महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन.

### संस्था भेट

आनंदवन, हेमलकसा, भामरागड; गुजराथ, आणंद अशा ठिकाणी भेट देऊन स्वतःच्या क्षमतांमध्ये वाढ







### समाज परिवर्तनासाठी पालवी

वंचित गटातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड टिकवून ठेवण्यासाठी अभ्यासपूरक खेळ व अभ्यास शिबिरांचे आयोजन

Samwadini is a women's organisation with Indian concept of strengthening women's innate power, rather than emphasizing the western concept of women's liberation

# सर्व वयोगटांशी सुसंवाद समुपदेशनाच्या माध्यमातून

संघटन



## उमलत्या वयाशी जुळवून घेतांना मैत्र समुपदेशन केंद्र – मुलांसाठी

मला सगळ्यांचा खूप राग येतो आणि खूप 'बोअर' पण होतं!



कधी मला मोठी म्हणतात तर कधी लहान, मग मोठ्ठं होणं म्हणजे काय ?

## बहर जोपासताना – पालकांसाठी











मुलाचं वेडं वय आणि करिअरची वर्षं कशी द्यायची जबाबदारीची जाणीव ?

लोकांच्या नजरेपासून मोठ्या होऊ लागलेल्या माझ्या लेकीला कसं जपू? काय सांगू ?







## सहजीवनाच्या उंबरठयावर लग्नेच्छूंसाठी



सहजीवन म्हणजे काय?
जोडीदाराची निवड कशी करू?



## वरील सर्व उपक्रमांसाठी प्रशिक्षक प्रशिक्षण

Counseling avenues for all age groups, sessions conducted in verious cities and towns.

# जिजामाता दल - पुणे

संघटन



वा. उषाताई खिरे यांच्या प्रेरणेने २५ वर्षांपूर्वी व्यक्तिमत्त्व विकासासाठी दलाची स्थापना झाली. सुरूवातीला ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्रीपालकांसाठी असलेल्या ह्या दलाच्या

बाहेरच्या माता देखील सभासद आहेत. दर सोमवार व बुधवारी सभासद एकत्र येऊन वेगवेगळे उपक्रम राबवितात. गीताध्याय पठण व ज्ञान प्रबोधिनीची उपासना केली जाते. नवनवीन प्रकल्प उदा. संत साहित्याचा अभ्यास, घर, मुलाखत तंत्र दर वर्षी तयार होतात. विविध सण साजरे केले जातात.





Women who are senior citizens are called 'Jijamata' in remembrance of Raja Shivaji's mother who moulded the mindset for Swarajya i.e. self-rule.

# स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

संघटन

## किशोरी विकास



सायकलींचे वाटप व शाळांमधून ग्रंथालय



गावोगावी कौशल्य प्रशिक्षण

१९९१-९२ : किशोरींसाठी अनौपचारिक खेळ,
१९९४: गावपातळीवर साप्ताहिक दले, निवासी शिबिरे सुरु
१९९७-९८: भव्य क्रीडाप्रात्यक्षिके, गावोगावी पथनाट्ये
२००९-१२ : १३ शाळांमधून व्यक्तिमत्त्व विकसन तासिका, ५५ गावांतील ४४० किशोरी सहभागी
३ जानेवारी २०१२ - ६४ किशोरींचा विद्याव्रत संस्कार

## युवती विकास





युवतींसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण वर्ग - शिवण, इलेक्ट्रॉनिक असेम्ब्ली, वारली पेंटिंग, ब्यूटी पार्लर, इ.

२००९ पासून गृहशुश्रूषा
(होम नर्सिंग) वर्ग सुरु
सहा महिन्यांचे कौशल्य प्रशिक्षण वर्ग
२५० युवतींना प्रशिक्षण



**Strengthening the spirits of school-going rural girls and teenagers through developmental activities**

# स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
# बचत गट

संघटन



## ग्रामीण महिलांचे नेतृत्व विकसन

- पंचायत राज प्रशिक्षण व मेळावे
- एकूण २८५ पैकी २०० बचत गटांची बँकेशी संलग्नता
- बँक व्यवहारांचे गटांना प्रशिक्षण
- 'खोपी' गावातील प्रत्येक घराचे बँकेत खाते
- राज्यपातळीवर अन्य संस्थांना मार्गदर्शन व प्रशिक्षण



- गाव पातळीवर केवळ महिलांच्या '२५'पेक्षा जास्त सहलींचे आयोजन – देवदर्शन व सामाजिक प्रकल्प दर्शनाचा मेळ
- नेतृत्व अभ्यास सहली – दिल्ली १९९८,
  गुजरात २००२
- २००७ मध्ये बचत गटाच्या प्रमुखांमधून स्वतंत्र 'जिजामाता प्रबोधन केंद्रा'ची स्थापना





**285 Self Help Groups (SHGs) of rural women from 40 villages are the entry point activity for Leadership Development**

# आर्थिक स्वावलंबन

## व्यवसाय प्रशिक्षण





जून १९९५ पासून बचत गट उपक्रमास सुरुवात

२०१२ मध्ये ४० गावात २८५ बचत गट – ५१०० खातेदार

दरमहा बचत २.२५ लाख रुपये जमा

आजपर्यंत ७ कोटी रुपयांचे कर्जवाटप

## आर्थिक व्यवस्थापन

- स्वयंरोजगार – गावातील महिलांचे कौशल्य प्रशिक्षण
- गटांच्या उद्योगासाठी विशेष मार्गदर्शन
- युरीया ब्रिकेट, शेवई तसेच वाख, वारली चित्रकला, इ. कलाकौशल्य आधारित उद्योग
- खाद्यपदार्थ उत्पादन
- प्रदर्शनात विक्रीसाठी सहभाग
- वर्षाला ८ लाखांपेक्षा जास्त उलाढाल
- कृषि पर्यटन व ग्रामीण जीवन परिचय
- सहलींचे आयोजन





Economic self sufficiency is the backbone of self respect of rural women - Jnana Prabodhini conducts training courses in many skills

# स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)
# आरोग्य

संघटन



१९९७ पासून वेल्हे तालुक्यातील २८ गावात आरोग्य प्रबोधिका

२००७ पासून आंबवणे केंद्रात गरोदरपणासंबंधी मासिक तपासणी सुरू



वंध्यत्वावरील उपचारानंतर अपत्यप्राप्तीचा आनंद

**आजपर्यंत ८० गावातील २४०० जणींची तपासणी**

२००८ पासून ग्रामीण युवती / महिलांची गावपातळीवर हिमोग्लोबिन तपासणी





२००० किशोरींसाठी सकस आहार प्रकल्प

पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी 'सुजल' फिल्टरचा प्रचार

Health care of rural women has been a neglected issue traditionally. Prabodhini provides voluntary services through expert doctors supplemented by local Prabodhikas.

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

# नागरवस्ती अभ्यासगट

संघटन

## २००२ मध्ये पुण्यातील नागरवस्त्यांमध्ये काम करण्याच्या हेतूने अभ्यासगटाची सुरुवात



नागरवस्त्यांच्या भेटी



निवडक २० वस्त्यांमध्ये कामाची सुरुवात



६० वस्त्यांना भेटी देऊन ५०० जणांच्या मुलाखती



लोकांच्या मागण्यांवरून प्रायोगिक उपक्रम सुरू

**Jnana Prabodhini works for All - Informal education in urban slums**

# अनौपचारिक शिक्षणातून विकास

## संघटन

महाविद्यालयीन युवक व व्यावसायिक तरूणांद्वारे नागरवस्तींमध्ये नियमित संपर्क



वस्त्यांमधील युवक दले



प्रज्ञा विकास उपक्रम



व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण



मातृभूमी पूजन – मार्कंडेय नगर



किशोरींसाठी दले
वडारवस्ती, दांडेकर पूल वसाहत, काशीवाडी, मातंगवस्ती

**जनी जनार्दन ऐसा भाव।**

Motivating the privileged youth to work for the deprived ones

# राष्ट्रीय एकात्मता



सर्वधर्म प्रार्थना व महापुरुष पूजा

राष्ट्रीय एकात्मता



सर्व धर्म आणि मतांचा समादर करताना भिन्नतेत पूल बांधणं हे ज्ञान प्रबोधिनीचे धोरण



**मातृभूमी पूजन**

दैवतांचे वैयक्तिक पूजन स्वागतार्ह, एकत्र आल्यावर मात्र 'राष्ट्र हेच दैवत'

**Building bridges across various social, political and religious denominations is an important policy of Jnana Prabodhini**

# पंजाब सद्भावना यात्रा
## १९८३ व १९८४

राष्ट्रीय एकात्मता

### अभ्यास देशस्थितीचा

दहशतवाद, अशांतता आणि फुटीरतावादी विचारांनी ग्रासलेल्या पंजाबातून जून १९८३ मध्ये ३७ युवक व १८ युवतींनी तसेच एप्रिल १९८४ मध्ये ८१ युवक व ३४ युवतींनी सद्भावना यात्रा काढल्या.
राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अनेक जाणकारांनी प्रबोधिनीच्या या प्रयत्नांचे स्वागत केले.

एक यात्रा आनंदपूर साहिब– रोपड – चंदीगड – पतियाळा – धुरी – लुधियाना – फगवाडा – जालंधर अशी, तर दुसरी फिरोजपूर – जीरा – पट्टी अशी जाऊन दोन्ही तुकड्या तरणतारण येथे एकत्र आल्या व पुढे अमृतसर सुवर्णमंदिरात समारोप झाला.





पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची भेट
जून १९८३



राष्ट्रपती श्री. ग्यानी झैलसिंग यांची भेट
एप्रिल १९८४



खलिस्तानच्या पुरस्कर्त्यांशी नजरानजर

### इतर महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या भेटी

- संत हरचंदसिंह लोंगोवाल
- ले.जन. सरताजसिंग
- दिल्लीमध्ये श्री यशवंतराव चव्हाण
- बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ
- मा. चौधरी चरणसिंग

Jnana Prabodhini's response to the unrest in Punjab was to send two Peace Missions that travelled through many towns and stayed in Swarna Mandir at Amritsar and conveyed feelings of national unity.




"You have got the right to worship Lord Ganesh !"
- Dr. Pendse told sex-workers in Daney Ali of Pune.

# सीमावर्ती राज्यांशी एकात्म संपर्क

राष्ट्रीय एकात्मता

## पूर्वांचल





- १९७० मध्ये नागा प्रदेशातील स्फोटक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासदौरा.
- १९८० च्या दशकात नागालँडमध्ये बी-जालुकी येथे शालेय शिक्षणाची व्यवस्था करण्यास पूर्णवेळ कार्यकर्त्यांची योजना
- १९९० च्या दशकापासून अरुणाचल प्रदेशातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी शिबिरे, प्रशिक्षण वर्ग व अभ्याससहली यांची योजना सुरू. पुण्यामध्ये शिक्षणासाठी आलेल्या पूर्वांचलीय विद्यार्थ्यांची 'North East Students' Society' ही संघटना स्थापण्यात पुढाकार

## जम्मू-काश्मिर

- शालेय विद्यार्थ्यांसाठी अनौपचारिक शिक्षणाची शिबिरे
- तरुणांसाठी संगणक प्रशिक्षण वर्ग, रोजगाराभिमुख उपक्रमांचा प्रयत्न
- समविचारी संस्थांच्या सहकार्याने व विधायक मार्गाने राष्ट्रीय एकात्मतेला पुष्टी






**People to people relations in Border states are very important for National Integration. Prabodhini extends hands of friendship in North-East as well as in Jammu and Kashmir**

# संघटनेची संकल्पना

संघटन



रोज संध्याकाळी जोरकस मैदानी खेळ खेळायला,गणेशोत्सवात उत्तम शिस्तबद्ध मिरवणुका करायला शालेय विद्यार्थी व युवक एकत्र जमतात.

प्रबोधिनीत येणारे युवक विविध जबाबदाऱ्या घेऊन नागरी वस्त्यांमधील कामात सहभागी होतात तसेच पुण्याच्या विविध भागात दल चालवू लागतात



**अशा जबाबदाऱ्या घेत-घेत संघटनेचे सदस्य अधिक जबाबदार होतात**

**प्रतिज्ञा ग्रहण समारंभ**



Youth organization starts with participation in daily sports activities. It nurtures youth to be more and more responsible.

# नियमित उपक्रम

## क्रीडा दल

संघटन



**खेळ खूप खेळुनी सतेज व्हायचे**



रोजच्या खेळानंतर मार्गदर्शक मुलांना खेळाबद्दल मार्गदर्शन करतात





मार्गदर्शक गटाबरोबर पूर्वी अशीच चर्चा करताना कै. माननीय आप्पा पेंडसे

दलावर इतर सामाजिक विषयांवर चर्चा मार्गदर्शन, अभ्यास इत्यादी नियोजित कार्यक्रम



Physical activities is the basic part of daily “dal” (youth gathering). Sessions to discuss social and current issues are an integral part.

# पुण्यातील भौगोलिक विस्तार

संघटन

पुण्याच्या विविध भागात अनेक शाळांमधील मुलांची क्रीडा दले

**१९६४**

**सदाशिव पेठ**
नियमित क्रीडा दलाची सुरुवात

**१९७२-९२**

**सहकारनगर**
वस्तीतील मुलांचे शैक्षणिक व रोजगाराचे विषय हाताळणारे
**शिवाजी दल**

**१९९६-९७**

**कोथरूड**
शेकड्याच्या संख्येने अन्य शालेय विद्यार्थ्यांची दले व युवकांचे दल

**२०००**

**कर्वेनगर**
क्रीडा दल,वर्षभर विविध विक्री उपक्रम चालवणारे
**चाफेकर दल**

**२००३**

**गोखलेनगर**
गणेश मंडळातून **आर्य चाणक्य दलाची** सुरुवात

**२००६**

**शुक्रवार पेठ**
आर्थिक मागासवर्गीय व मध्यमवर्गीय घरातील मुलांना संस्कारक्षम बनविणारे
**संभाजी दल**

**२०११**

**वडारवस्ती, कासेवाडी**
या दोन वस्तीतील शालेय गटावर काम करणारे **शहीद भगतसिंह युवक दल**

**२०१२**

**विंझर (वेल्हा), नसरापूर**
ग्रामीण तरुणांच्या नेतृत्व विकसनासाठी वेल्ह्याजवळ विंझर येथे नियमित होणारे
**नेताजी सुभाषचंद्र बोस दल**

विज्ञान प्रयोगांसाठी नियमित भेटणारे
**मेघनाद साहा दल**

**सांगवी, हडपसर, धायरी, सिंहगड रस्ता येथे नवीन दले प्रस्तावित**

Starting from a single dal, youth orgnization has now expanded to 8 different parts of Pune encompassing slum areas and in rural areas.

# शिबिरे आणि सहली

## सहनिवास, सहविचार आणि सहकृतीचे शिक्षण

संघटन

### ग्रामीण जीवन परिचय शिबिर







### साहस कार्य

स्वतःच्या क्षमतांना आह्वान देण्याचे शिक्षण



### तंबू शिबिर

अवघड परिस्थितीत तंबू लावून, परिसराचा अभ्यास करत एकत्र राहण्याचा अनुभव

Together we live.. Together we think..
Together we work.. Together we dream!

# अभ्यास शिबिरे

संघटन

कर्तृत्वाला विचारांची योग्य जोड मिळावी म्हणून
वैचारिक व चिंतनपर विषयांचा एकत्र येऊन अभ्यास



**प्रबोधिनी तत्त्व-विचार अभ्यास**

प्रबोधिनीचे तत्त्वसप्तक, विचार
साम्यवाद, समाजवाद इत्यादी
विचारसरणीचा अभ्यास

**चरित्र अभ्यास**

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, भगिनी निवेदिता,
महात्मा गांधी, स्वा. सावरकर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इत्यादी.

**राष्ट्रीयत्व अभ्यास**

हिंदुत्व, विकास कल्पना, ग्रामीण अर्थव्यवस्था, विविध युद्धे,
स्वातंत्र्योत्तर भारत, विविध प्रदेशांचा अभ्यास, इत्यादी.



**अभ्यास दौरे**

समाजाच्या चालीरीती, त्यांचे सामर्थ्य, प्रश्न या सर्वाविषयी आपलेपणा वाटावा व
देश-परिस्थितीची ओळख व्हावी म्हणून दौरे व सहली

**प्रश्न-केंद्रित अभ्यास दौरे**

हिंदी भाषा अभ्यास दौरा, ओरिसा अभ्यास दौरा इत्यादी

**प्रांत अभ्यास दौरे**

सीमावर्ती राज्यांचे अभ्यास दौरे
महाराष्ट्रात विदर्भ, खानदेश, कोकण अभ्यास दौरे इत्यादी

Actions are futile without the suppliment of thoughts.
Study camps on various topics are regularly organized.

# क्रीडा - प्रात्यक्षिके

संघटन

विवेकानंद जयंतीला प्रबोधिनीच्या
युवक संघटनेत घडणाऱ्या पौरुषाचा आविष्कार



सामूहिक कर्तृत्वाचे विविध आविष्कार

शिस्त,सामूहिकता आणि त्यातून तयार
होणाऱ्या सौंदर्यातून संघटना दर्शन





**मोठ्या समूहाची रेखीव मांडणी आणि शिस्तबद्ध हालचाल
हे संघटनेच्या शिस्तीचे द्योतक**

On the occasion of Youth Day,
strength of youth organization is demonstrated.

# विक्री कौशल्य प्रशिक्षण उपक्रम

## व्यवहार शिक्षणाची शाळा

संघटन

वस्तू असो की कल्पना, समोरच्याला आपली गोष्ट घ्यायला लावणे हे विक्रेत्याचे कौशल्य



फटाकेविक्रीत भरपूर गिऱ्हाईके हाताळणारे कुमार व युवक

विक्री कौशल्याचे प्रशस्तीपत्रक: गर्दीचा ओघ ज्ञान प्रबोधिनीच्याच फटाक्याच्या दुकानाकडे





दिवाळीमध्ये युवकांनी चालवलेला भटारखाना

पणती व आकाश कंदील विक्री



Practical learning of marketing and all aspects of business through various experimental models

# गणेशोत्सव

## आदर्श गणेश मिरवणुकीचे आद्य प्रवर्तक

संघटन

**या निळ्या मोकळ्या अंबरी विहरते**
**हिंदु ऐक्याची ध्वजा**



महाराष्ट्रात प्रत्येक गणेश मंडळाने भारताचा सांस्कृतिक ध्वज लावलाच पाहिजे असा आग्रह प्रबोधिनीने धरला

**रस्त्यावर आवेशात आणि पाहावेसे वाटेल असे नाचू !**

१९६५ सालापासून 'बर्ची' ह्या शस्त्रासह रणनृत्य करणारे प्रबोधिनीचे युवक पुण्यात दिसू लागले



**पुढे भगवा ध्वज, त्यामागे आवेशात बर्चीनृत्य करणारे युवक आणि शेवटी धुंद करणारा जोशपूर्ण वादकगट**



गेल्या काही वर्षांत प्रबोधिनीबाहेर अशा वाद्य आणि ध्वजधारीगटांचा मोठा प्रसार. ढोलाच्या तालावर देखणे नृत्य करणारे गट अजून पुरेसे नाहीत, हे रुजविण्याचे पुढचे काम!

Jnana Prabodhini is pioneer of the ideal Ganesh procession which has now become signature of Ganesh festival in Pune.The procession comprises of *dhwaj* (flag), *barchi* (weapon) and *vadya* (drums).

# कार्यसाधने

संघटन




Facets of youth gathering (dal): Sports, science, entrepreneurship training, educational activities for students on rural outskirts and slums in Pune.

# युवक गटांचे उपक्रम

संघटन

कामाचे विविध विषय हाताळत गटबांधणी,
संघटना कशी घडावी याचे प्रयोग



शिवजयंतीला झालेला पोवाड्यांचा कार्यक्रम,निगडी



युवकांचे रक्तदान शिबिर, पुणे



भटारखाना व खाद्यवस्तू विक्री



प्लास्टिक कचरा व्यवस्थापन,डोंबिवली



वृक्षारोपण



विज्ञान दल

Activities conducted over the last couple of years: tree plantation, plastic garbage management, blood donation drive, food production & sale, etc.

# आपत्ती निवारण

संघटन



- १९६७ – कोयना भूकंप : १३० गावांमध्ये प्रबोधिनीचे कार्यकर्ते प्रत्यक्ष गेले.
- ३५० गावात वैद्यकीय मदत पोचवली.
- १००० लोकांना साहाय्य केले.
- २०,००० कपडे वाटले.



१९७७ साली आंध्र प्रदेशात झालेल्या वादळानंतर मदतीसाठी कार्यकर्ते धावून गेले.
प्रेतांची विल्हेवाट लावण्याचे अवघड काम.
घरबांधणी, धान्य, कपडे, साहित्य वाटप.
हरिजनांपर्यंत मदत पोहोचत नसल्याने तीन हरिजन वाड्यांमध्ये विशेषत्वाने काम.



Even before the science of “Disaster Management” was evolved, volunteers of Jnana Prabodhini used to rush for relief works wherever required in the country.

# किल्लारी भूकंपातून नवनिर्माण हराळी

संघटन

## ३० सप्टेंबर १९९३ चा विनाशकारी भूकंप – किल्लारी









सप्टेंबर १९९३ मध्ये दक्षिण मराठवाड्यात मोठा भूकंप झाला. ८,००० माणसं मृत्युमुखी पडली. भूकंपाच्या दुसऱ्या दिवसापासून ज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते या भागात पुनर्वसनाच्या कामाला भिडले. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील हराळी हे गाव सोलापूरपासून सुमारे ७५ कि.मी. वर आहे.

- भूकंपस्थितीमुळे शिक्षणाची वाताहत
- परिसरातील शाळा बंद
- हराळी गावातील ग्रामस्थांच्या आग्रहामुळे या गावी १९९५ च्या जूनमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळेचे वर्ग सुरु
- भूकंपग्रस्त भागातील लोकांचे पुनर्वसन कार्य करताना रोजगार निर्मितीची साधने उपलब्ध करुन दिली
- युवक वयोगटासाठी आधुनिक शेती शिक्षण देणारे कृषी विद्यालय जुलै २००६ ला सुरु
- ग्रामीण भागातील महिला आर्थिक साक्षर होऊन स्वावलंबी होण्यासाठी, बचत गटातून आर्थिक विकास होण्यासाठी स्त्री शक्ती प्रबोधन केंद्राची स्थापना






From the ruins of devastating earthquake of 1993, the phoenix of development rose at Harali, near Solapur and Osmanabad.

# अंबाजोगाई विस्तार केंद्र

संघटन

**अंबाजोगाई, जि. बीड येथील विस्तारकेंद्राचा प्रारंभ १९९९ साली .**
**उपासना केंद्रांच्या माध्यमातून संघटनेचा अभिनव प्रयोग**



**अंबाजोगाईतील सार्वजनिक गणेशोत्सवात केंद्राचा वैविध्यपूर्ण सहभाग**



विवेकवाडी या जागेवर ग्रामीण भागातील बदलाचे प्रयोग



प्रबोध कुटुंब : कुटुंबातील सर्वजण प्रबोधिनीची प्रतिज्ञा घेताना

Meditation groups lead to form youth organisation at Ambajogai Extension Centre in Beed district of Marathwada.

# सांगली विस्तार केंद्र

संघटन




**१९७८ मध्ये सांगलीमध्ये उपक्रमांना प्रारंभ**

- नियमित युवक व युवती दले
- स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केंद्र
- अभ्यासिका





सांगली केंद्र कार्यकर्त्यांची जिल्ह्यातील आंदोलनाच्या नेत्याबरोबर भेट

**केंद्रावरील कार्यकर्त्यांतर्फे सांगली जिल्ह्यात विशेष उपक्रम**

- शालेय विद्यार्थ्यांचे विज्ञान-प्रकल्प प्रदर्शन व स्पर्धा
- अन्य गावांतील शाळांत संगणक प्रशिक्षण



प्रतिज्ञाग्रहण समारंभ



**केंद्रावरील अन्य उपक्रम**

- तंबू शिबिर
- विविध विषयांवरील अभ्यास शिबिरे
- गणेशोत्सव

The youth of Sangli started activities of Jnana Prabodhini in 1978. Now it is an extension centre in South-West Maharashtra

# बोरीवली विस्तार केंद्र

संघटन



## २०१२ – नवीन ठिकाणी प्रबोधिनी परिचय

- मुंबई शहर – गिरगांव, दादर, वांद्रे
- मुंबई उपनगर – अंधेरी, कांदिवली, मालाड, गोरेगाव
- जिल्हा – ठाणे, विरार, पालघर, वाडा

## २०१०

- केंद्राची तपपूर्ती
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उपक्रम सुरू
- १५० विद्यार्थी



## २००७

- केंद्राची दशकपूर्ती
- १० नावीन्यपूर्ण उपक्रम



## २००५

- महिलांसाठी संवादिनी उपक्रम
- ३५० सदस्या



## २००३

- छात्र प्रबोधन तपपूर्ती – मेळावे – संमेलने
- १००० – १२०० विद्यार्थी सहभागी

## १९९९

- पहिले विद्याव्रत शिबिर
- आत्तापर्यंत ६०० विद्यार्थी सहभागी

## १९९७

- साप्ताहिक विकासिका उपक्रम सुरू
- आजपर्यंत १८०० विद्यार्थ्यांचा सहभाग



A contact point of Chhatra Prabodhan magazine turned into a full-fledged Extension Centre of Jnana Prabodhini - at Borivali since 1997

# डोंबिवली विस्तार केंद्र

## कल्याण, बदलापूर, ठाणे येथे प्रबोधिनीचे उपक्रम

प्रारंभ १९९५

संघटन





### पर्यावरण गट

निर्माल्य व प्लॅस्टिकचे वर्गीकरण

### पालक मंडळ

- सदस्य संख्या २०
- कार्यशाळा
- व्याख्याने
- कृतिसत्रे
- गटकार्ये

### इतर उपक्रम

- साप्ताहिक उपासना
- मातृभूमी पूजन
- सार्थ भजन
- कार्यकर्ता प्रशिक्षण
- प्रतिज्ञाग्रहण
- प्रबोधिनी प्रकाशने विक्री
- हराळी उत्पादने



संवादिनी





### पौरोहित्य वर्ग

- २०१२ मध्ये ५० घरांमध्ये ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने गणेश प्रतिष्ठापना व सत्यनारायण पूजा झाल्या.

### कुमार गट

- विद्याव्रत संस्कार – ८ वेळा आयोजन – २८७ जण सहभागी
- शिबिरे व सहली – ५० ते ६० जण
- कलचाचणी – ५ वेळा आयोजन – ४८५ लाभार्थी



Sustained Motivation to do an organised good work took a shape of Extension Centre of Jnana Prabodhini in Dombivali, since 1995.

# युवती विभाग



## इतिहासाची उलटू पाने ..

१९६४ – युवती रविवार बैठक
युवती विभाग सुरुवात
१९७२ – युवती प्रबोध शाळा
१९७५ – कन्यका प्रशाला
१९७७ – नियमित दले
१९८० – पुण्याबाहेरील क्रीडा शिबिरे





१९८१ – युवती प्रबोध दले
१९८३ – दोन युवती पंजाबमध्ये दोन वर्षांसाठी पूर्ण वेळ
१९८६ – बर्चीनृत्याद्वारे युवतींचा गणेशोत्सवात सहभाग
१९८९ – सोलापूरला दोन युवती कार्यकर्त्या वर्षभर पूर्णवेळ कामासाठी
१९९५ – शारदोत्सव परिसंवाद व क्रीडा प्रात्यक्षिके



२००५ – नेतृत्व प्रशिक्षण शिबिर,
नियमितपणे विक्री उपक्रम
२०१० – नागरवस्ती गटाच्या कामात
युवतींचा सहभाग
खूप काळाच्या खंडानंतर
प्रबोधिनीत युवतींचे पूर्णवेळ काम

संघटन

A Historical Review Of Yuvati Vibhag

# युवती विभागाचे उपक्रम

## चित्ररूप दर्शन

संघटन




Pictorial glimpses of Yuvati Vibhag Activities

# शालेय उपक्रमातून गटबांधणी

संघटन



क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये काठीवरील संचलन

युवतींनी किशोरींसाठी, युवतींसाठी विविध उपक्रम योजावेत म्हणून केलेले युवतींचे संघटन ! शालेय गटातील मुलींच्या व्यक्तिमत्त्व-विकसनासाठी, वृत्ती-घडणीसाठी अन् प्रेरणा-जागरणासाठी योजलेले उपक्रम.

**ज्ञान प्रबोधिनी प्रशालेय गट**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील मुलींसाठी योजलेले विविध उपक्रम. नियमित क्रीडा दल, क्रीडा शिबिरे, अभ्यास शिबिरे, तंबू शिबिरे, क्रीडा प्रात्यक्षिके, वर्षा सहली इ.

**सर्व उपक्रमांचे संयोजन पदव्युत्तर युवतींनी करण्याची परंपरा**

**अन्य प्रशालेय गट**

पुणे शहरातील विविध शाळांमधील मुलींसाठी योजलेले प्रासंगिक उपक्रम!





विज्ञान दल, गटकार्ये, विज्ञान-शिबिरे, व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे, इ.

Activity based training for students of Jnana Prabodhini as well as of other schools.

# महाविद्यालयीन युवतींचे सामाजिक उपक्रम

संघटन

## महाविद्यालयीन गट

**सामाजिक जाणीव संवर्धन**

नागरी वस्ती गट तसेच ग्रामीण गट
किशोरी, युवतींच्या विकासासाठी
पुण्यातील वस्ती भागात / ग्रामीण भागात
प्रबोधिनीतील अन्य विभागांद्वारे चालू
असलेल्या कामात सहभागी.


पालखीतील सहभाग


नागरी वस्तीतील विकासिका


भातलावणीतून ग्रामीण कार्यानुभव

**विभागाच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विक्री उपक्रम**

तिळगुळ, आयुर्वेदिक धूप, राखीसंच, आकाशकंदील संच






Youth Wing for College-going Girls.

# युवती विभाग, निगडी

**नवनगर विद्यालयाशी जडलेले नाते कायमचे –**



बैठकी, वाचन, चर्चा

संघटन



साप्ताहिक दल



अभ्यास दौरा



गणेशोत्सव– वादक गट

कलाक्षेत्रात आवड असणाऱ्या युवतींच्या अभिव्यक्तीचा कार्यक्रम 'साद'




Youth Wing at Jnana Prabodhini, Nigdi.

# यापुढे यशाकडे ...

संघटन



युवती विभागाने घेतलेला
येत्या दहा वर्षांचा वेध



**नियोजन**

**शहरी किशोरी गटासाठी**

मजबूत दलरचना, पथक–पद्धती
व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे
कौशल्य प्रशिक्षण वर्ग
विद्याव्रत संस्कार, पाठपुरावा

**युवतींसाठी**

विशेष अभिरुची गट,
विशेष उद्दिष्ट गट,
अभ्यासगटांमध्ये समावेश
समाजदर्शन कार्यक्रम
उद्योजकता प्रशिक्षण



**नागरीवस्ती तसेच**
**ग्रामीण गटासाठी**

विद्याव्रत संस्कार
स्वयं–रोजगार पूरक
कौशल्य प्रशिक्षण

Striving with determination
10 years' perspective plan

# कालोचित सेवा उपक्रम

## व्यवस्थापन महाविद्यालय

संगणक प्रशिक्षणाचा प्रारंभ

१९८५ च्या सुमारास पर्सनल कॉंप्युटर्स (PC) वापराची पुण्यात सुरुवात होण्यामध्ये प्रबोधिनी अग्रभागी.

इ. ८ वी पासून संगणक भाषांचे अध्यापन पुण्यात प्रथमच सुरू.

उद्योग-व्यवसायात काम करणाऱ्या प्रौढ सदस्यांसाठी सायंकालीन वर्ग १० हून अधिक वर्षे चालविले. अन्यत्र सुविधा नसताना ५००० हून अधिक व्यावसायिकांना संगणक तंत्रज्ञानाचा परिचय.

व्यवस्थापनातील अन्य २ अभ्यासक्रम ५ वर्षे चालू.

## तांदूळविक्री व दूधविक्री

शिवगंगा - गुंजवणी खोऱ्यातील अस्सल आंबेमोहोर तांदूळ आणि बिनाभेसळीचे दूध पुण्यातील ग्राहकांना उपलब्ध करण्यात पुढाकार - १९७० च्या दशकात.

अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांचे त्यातून विक्रीकला प्रशिक्षण. शेतकऱ्यांचा थेट ग्राहकांशी संपर्क साधून दिला. त्यातील काहींना स्वतंत्र दुकाने थाटण्यास मदत.

## छायामुद्रण, टंकलेखन

पुण्यात डेस्क टॉप पब्लिशिंग (डीटीपी) सेवा सुरू होण्याआधी इलेक्ट्रॉनिक यंत्रावर टंकलेखनाची सुविधा व्यावसायिक तत्त्वावर पुरविली.

छायामुद्रण विभागात मुद्रणाच्या विविध तंत्रज्ञानांचा क्रमश: वापर करीत ग्राहकांना सेवा दिली. आर्थिक स्वावलंबनाचे अनेक प्रयोग व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण.

## वनवासींचे आर्थिक स्वावलंबन

नंदुरबार जिल्ह्यातील वनवासी तरुणांना मासेमारी, बटेरपालन, मधमाशापालन इ. कौशल्यांच्या प्रशिक्षणांची शासकीय संस्थांमध्ये प्रबोधिनीद्वारे ८ वर्षे खटपट चालू.

गडचिरोली जिल्ह्यातील वनवासींना वनहक्क कायदा २००६ चे लाभ मिळवून देण्यासाठी कार्यपद्धतीत साहाय्य. गौण वनउपजामध्ये बांबूचा समावेश होण्यासाठी केंद्रशासनाशी लढा यशस्वी. मेंढा(लेखा) गावसमाज आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास व्यवस्थापकीय हातभार.

वर्धा व अमरावती जिल्ह्यांमध्ये शेती सुधारणेचे ६ वर्षे प्रयोग.

**Computer training in the initial era of PC usage, rural youngsters trained in the trading of rice and milk, printing services provided, tribals in Vidarbha assisted in livelihood skills.**

# ज्ञान प्रबोधिनी

## भविष्यवेध

प्रयत्नवादी संघटनांनी वापरण्याचे 'भविष्यवेध' हे एक शास्त्र आहे. प्रबोधिनीने कार्यकर्त्यांच्या सहविचाराने पहिला भवितव्यलेख १९९४ ते २०१२ या कालावधीसाठी तयार केला. त्याचे साध्यसूत्र होते –

**'देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढविणे.'**

त्यासाठी नेतृत्व विकसन, स्त्री शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, विस्तार आणि कार्यकर्ता प्रशिक्षण अशा ५ उद्दिष्ट प्रधान दिशा ठरविण्यात आल्या. तसेच शिक्षण, ग्रामविकसन, आर्थिक स्वायत्तता, संशोधन व आरोग्य या ५ कार्यप्रधान दिशा निश्चित करण्यात आल्या. गेल्या १८ वर्षांची प्रबोधिनीची वाटचाल या दिशांनी झालेली आहे. दर २ वर्षांनी त्याचा आढावा घेत व काही भर घालत मार्गक्रमणा झाली.

सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने २०१२ ते २०२१ या दहा वर्षांसाठी प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांनी व विभागांनी नवा भवितव्यलेख तयार केला आहे. त्याचे साध्यसूत्र आहे –

**'नेतृत्वगुण विकसन करणारी ज्ञान प्रबोधिनीची मनुष्यघडणीची प्रक्रिया शालेय वयोगटाच्या पुढे विस्तारित करणे.'**

या आगामी १० वर्षांसाठी पूर्वीचे साध्यसूत्र कायम ठेवून नवीन उपक्रमांची भर मुख्यत: १५ ते ३५ या वयोगटासाठी घालावयाची आहे.

**'नेतृत्व प्रशिक्षण केंद्र'** हा नवा विभाग सुवर्णमहोत्सवी वर्षात त्यासाठी सुरु करीत आहोत.



A Perspective Plan for the next 10 years has been prepared. Leadership Development Centre is launched in the golden jubilee year.

# ज्ञान प्रबोधिनी
## सहभागाचे आवाहन

ज्ञान प्रबोधिनीच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला कामात सहभागी होता येते.

कोणत्याही वयोगटात असलेल्या स्त्री–पुरुष सदस्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष खालील विषयांवर काम करून प्रबोधिनीच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करीत आहोत.

१. **शैक्षणिक** – समाजाच्या सर्व स्तरांतील गुणांचा शोध व त्याला उत्तेजन, माहिती तंत्रज्ञानाद्वारे ज्ञान व कौशल्यांचे प्रशिक्षण, नेतृत्वविकसनास पूरक संधी व उपक्रम.

२. **सामाजिक** – सामाजिक शास्त्रांमध्ये छोटे–मोठे प्रकल्प, सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन, सार्वजनिक आरोग्यासाठी उपक्रम.

३. **सांस्कृतिक** – विविध जाती व धर्मांमध्ये पूल बांधण्याची राष्ट्रीय एकात्मतेची भूमिका, सीमावर्ती राज्यांमध्ये भारतीयत्वाचे बंध बळकट करणे, भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक अधिष्ठानाचा जगभर पुरस्कार करणे.



या विषयांवर प्रबोधिनीने योजलेल्या विविध उपक्रमांमध्ये वेळोवेळी सहभागी होण्याचे विनम्र आवाहन !

**Come one, Come All !**
**Participate in Prabodhini's work of your choice!!**

# ज्ञान प्रबोधिनी

## प्रार्थना

राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची
ही हिंदुभू परमश्रेष्ठपदास न्याया
आम्ही कृती नित करू झिजवोनि काया



विज्ञान-ज्ञान अमुचे परिपूर्ण होवो
अभ्यास देशस्थितिचा समतोल चालो
निष्ठा विवेक प्रकटो मन पूर्ण शुद्ध
वर्तू अम्ही दृढप्रसन्न नि ध्येयधुंद

होती अनेक हृदये जरि एकरूप
सामर्थ्य तेथ प्रकटेल तरी अमूप
हा मंत्र संघरचनार्थ सदा जपू या
हे ज्ञान-कर्म-युत भक्ति-व्रत आचरू या

की पुण्य-श्रेय-यश-कीर्ति सदैव लाभो
निंदा-प्रहार अथवा नच कोणि लोभो
आशा हसो विमल व भिववो निराशा
सोडू कधी न पथ हा चिर ठेवु आशा



दाही दिशांत घुमुनी जयनाद जेव्हा
होई अखंड प्रियभूमि अजिंक्य तेव्हा
हृन्मंदिरातिल निवेल तृषा कधीची
हे देव आस पुरवी तव पूजकांची

की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने
लब्ध-प्रकाश-इतिहास-निसर्गमाने
जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे

**The Prayer of Jnana Prabodhini - Inspiration for tireless striving till the goal is accomplished.**

### क्रमिक शिक्षणातील प्रयोग



निवडक संख्येच्या कुशाग्र बुद्धिमंतांच्या नेतृत्वगुण
विकसनासाठी प्रयोगशील वातावरणाची जोड

### ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

मोठ्या संख्येच्या अनुदानित शाळेत चैतन्यपूर्ण शिक्षणाचे प्रात्यक्षिक
- पंचकोष विकसनाच्या भारतीय संकल्पनेवर आधारित गुरुकुल
- स्पर्धात्मक खेळांतून राष्ट्रीय अस्मितेची जोपासना करणारे क्रीडाकुल

### ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी

ग्रामीण समृद्धीची पायाभरणी करणारे तालुका पातळीचे विकासकेंद्र

### ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे

उत्तुंग शैक्षणिक यशासमवेत सामाजिक जाणिवेच्या स्फुरणाचा आविष्कार

### ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, सोलापूर

मराठवाड्याच्या विकासाला चालना देण्यासाठी निवासी शिक्षणाचा शेतीनिष्ठ प्रयोग

### ज्ञान प्रबोधिनी, हराळी



### अनौपचारिक शिक्षणप्रणाली

**युवक-युवती विभागांद्वारे**
क्रीडादले, विकासिका, साहस सहली,
निवासी शिबिरे, विज्ञान दले

**छात्र प्रबोधन मासिकाद्वारे**
२ राज्यांतील २० जिल्ह्यांत कृतिशील संघटन

**प्रज्ञा मानस संशोधिकेद्वारे**
बाल व युवा गटांचे अनुभवशिक्षण

**शैक्षणिक उपक्रम संशोधिकेद्वारे**
अध्ययन कौशल्यांचे शिक्षण

**अंबाजोगाई येथे**
संस्कारप्रधान उपक्रमांतून प्रेरणाजागरण

### उपेक्षितांसाठी शिक्षण प्रकल्प



ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी
साखर कारखान्यांच्या परिसरात

**हंगामी साखरशाळा**

ग्रामीण भागात विखुरलेल्या बुद्धिमत्तेच्या संवर्धनासाठी

**ग्रामीण प्रज्ञा विकास व किशोरी विकास प्रकल्प**

सहवासातून संस्कारासाठी

**साळुंब्रे व हराळी येथे निवासी गुरुकुले**

बालकामगारांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी

**शिक्षण प्रकल्प- सोलापूर**

## ज्ञान प्रबोधिनी : शालेय शिक्षण प्रभाग

## शिक्षणातून प्रेरणासंवर्धन व वृत्तिघडण



उत्तुंग शैक्षणिक यशासाठी तंत्र आणि मंत्र,
व्यक्तिमत्त्व विकासासाठी वैयक्तिक लक्ष
यांतून होणारा बुद्धीचा व क्षमतांचा विकास
**समाजाचे ऋण फेडण्यासाठी !**

**स्वामी विवेकानंदांच्या कल्पनेतील मनुष्यघडणीसाठी**
**आजच्या युगातील अभिनव राष्ट्रीय शैक्षणिक प्रयोग : ज्ञान प्रबोधिनी**

एकात्मता, संशोधन, **शिक्षण,** ग्रामविकास, आरोग्य

# ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था (ज्ञाप्रसंसं)

## समाज परिवर्तनासाठी प्रज्ञा व क्षमता यांचा शोध आणि विकास

संशोधन । मापन । अध्यापन । प्रशिक्षण । विस्तार सेवा

संशोधन

**संशोधन**

(१९७० ते २००६)

**मानसशास्त्र**

(पुणे विद्यापीठ व विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता)

**आयुर्वेद**

**शिक्षण**

**संस्कृत व भारतीय संस्कृती**

(पुणे विद्यापीठ मान्यता)

**जैववैद्यकीय मानसशास्त्र**

### संशोधन

- बुद्धीचे १२० पैलू तसेच प्रज्ञावंतता, जीवनाची गुणात्मकता यांचा शोध
- क्षमता व व्यक्तिमत्त्व यासाठी मनोमापन चाचण्या
- आंतरराष्ट्रीय सहयोगाने वरील क्षेत्रातील संशोधन
- विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी गुणवर्धन अभ्यासक्रम निर्मिती
- बहुभाषिक व संगणकीकृत अभिक्षमता (Aptitude) चाचण्या
- संस्कृत व भारतीय संस्कृति यांच्या संवर्धनासाठी प्राचीन साहित्याचा अभ्यास
- 'सूक्ष्म-औषधी' स्वरूपात आयुर्वेदिक औषधे
- आयुर्वेदाच्या संकल्पनेतून-नवीन आजार व अन्नपदार्थ
- वैद्यकीय उपचार पद्धतीच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन
- मनोसामाजिक घटकांचा आजारांवर होणारा परिणाम
- पीएच्.डी. साठी मार्गदर्शन

### अध्यापन व विस्तार सेवा

- मानसशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम
- संशोधन व फलितांचे उपयोजन यासाठी प्रशिक्षण
- समायोजन समस्यांबाबत समुपदेशन
- मनोमापन व मानवसंसाधन यासाठी औद्योगिक संस्थांना सल्ला.
- मेन्सा-इंडिया या संस्थेसाठी बुद्धिमंतांची निवड
- बाल-युवा विकास शिबिरे
- दहावीच्या पुढे करिअर निवडीसाठी संगणकीय चाचण्या व मार्गदर्शन
- विविध संस्कारविधींचे आयोजन व प्रशिक्षण
- कुंडीमध्ये आयुर्वेदिक वनस्पती-परिचय वर्ग
- घरगुती वापरासाठी आयुर्वेदिक औषधे व सौंदर्य प्रसाधने यांची निर्मिती -परिचय वर्ग
- आयुसॉफ्ट - संगणकीकृत प्रकृति-परीक्षण

ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था, ज्ञानप्रबोधिनी भवन, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

% (०२०) २४२०७१४२ **E-mail :** jpip@jnanaprabodhini.org

**Website :** www.jppsychology.com

**शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, संघटन**

## ज्ञान प्रबोधिनी

# ज्ञान प्रबोधिनी-प्रशिक्षण सेवा

## प्रशासकीय सेवा (स्पर्धा परीक्षा) उमेदवार प्रशिक्षण

स्वच्छ, कार्यक्षम, मूल्याधिष्ठित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या घडणीसाठी रचनात्मक काम.

ज्ञान, कौशल्य, वृत्तीघडण या त्रिसूत्रीवर आधारित प्रशिक्षण, वर्गाध्यापनाबरोबरच प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, अनुभवातून अभ्यास.

'स्व'ची ओळख, प्रशासकीय यंत्रणेची ओळख,समाजाची ओळख यासाठी विशेष उपक्रम

आजपर्यंत MPSC परीक्षेतून ५७७ व UPSC परिक्षेतून १७० अधिकाऱ्यांची विविध प्रशासकीय पदांवर निवड

महाराष्ट्राच्या सर्व तालुक्यांमध्ये, देशाच्या २१ राज्यांमध्ये व चार देशांमध्ये ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राचे अधिकारी कार्यरत.

## औद्योगिक प्रशिक्षण

मोठ्या व मध्यम उद्योगांमधील मानव संसाधन विकासासाठी मानसशास्त्राधारित प्रशिक्षण

सर्वसाधारण कर्मचारी सदस्यांपासून ते ज्येष्ठ व्यवस्थापकांपर्यंत अनेक पातळ्यांवरचे प्रशिक्षण वर्ग

सर्जनशीलता, निर्णयक्षमता, मानवी सहसंबंध, संवाद कौशल्य, वाचन कौशल्य, नेतृत्व, ताण-व्यवस्थापन, गटकार्य-गट बांधणी, कार्यकारी विकास इ. साठी प्रशिक्षण कार्यक्रम

स्वयंरोजगार, उद्योजकता प्रशिक्षण

## शैक्षणिक प्रशिक्षण

बालविकास प्रशिक्षक शिबिरे ७ ते १२ वयोगटातील मुलांच्या विकसनासाठी मानसशास्त्रीय खेळांवर आधारित कृति कार्यक्रम घेण्यासाठी प्रशिक्षकांची तयारी

**शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका**

-दीड वर्षाचा पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त अभ्यासक्रम - व्यवसायानुभव (internship)

**पालकत्व प्रशिक्षण**

पालकत्वाचे विविध आयाम समजावून देणारी, पालकत्वाच्या क्षमता समृद्ध करणारी कार्यशाळा

**शिक्षक व मुख्याध्यापक प्रशिक्षण शिबिरे**

'रूप पालटू शिक्षणाचे' अंतर्गत शैक्षणिक संस्कार, प्रकल्प पद्धती, स्वयं अध्ययन कौशल्य, अग्रणी योजना इ. प्रयोगांचे प्रशिक्षण

## शिक्षण,संशोधन, संघटन, ग्रामविकसन, आरोग्य

## ज्ञान प्रबोधिनी

कार्यक्षेत्रे - पुणे, निगडी, सोलापूर, शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई याशिवाय महाराष्ट्रात २० ठिकाणी प्रासंगिक उपक्रम केंद्रे.

मुख्य केंद्र - ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०. ०२०-२४२०७०००

ई-मेल-prabodhini@vsnl.com संकेतस्थळ- www.jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी
# ग्रामविकसन प्रभाग
## ५० वर्षांची वाटचाल



### पाणी

- गावकऱ्यांच्या श्रमदानातून विहीर – खोदाई हा प्रारंभबिंदू
- हातपंप उभारणी तंत्रज्ञान व दुरुस्तीबाबत युनिसेफशी साहचर्य
- पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प : कपार्ट, नवी दिल्ली द्वारे ८,००० हेक्टरवर काम
- टाटा समूहप्रणीत ‘सुजल’ फिल्टरचे उत्पादन–प्रशिक्षण
- जलस्वराज्य प्रकल्प : लोकसहभागासाठी अधिकाऱ्यांचे क्षमता विकास प्रशिक्षण
- खारपड जमीन विकास प्रकल्प व भूजल जाणीव जागृती मेळावे



### आरोग्य

- २३६ खेड्यांतील सव्वा दोन लाख लोकसंख्येत कुष्ठरोग निवारणाचे कार्य, कुटुंबात राहिलेल्या रुग्णांचे प्रमाण बहुऔषधी उपचारांनी दर दहा हजारी ३८ वरून २ च्या आत
- दुर्गम भागात माता व बालके आरोग्य प्रकल्प, ग्रामीण महिलांना आरोग्य प्रबोधिका प्रशिक्षण
- औषधी वनस्पतींची लागवड,
- नेत्रचिकित्सा व उपचार शिबिरे



### ऊर्जा

- ४,००० हून अधिक बायोगॅसची ४ जिल्ह्यांत उभारणी
- शौचालये व बायोगॅस एकत्र जोडण्याचा आदर्श गाव नमुना
- विद्यार्थी वसतिगृहांसाठी १० व २० घनमीटर क्षमतेचे बायोगॅस संयंत्र
- सौर ऊर्जेच्या उपकरणांचा प्रसार



### स्त्री शक्ती प्रबोधन

- दारूबंदी आंदोलनातून एकत्र आलेल्या महिलांचे ३०० बचतगट सुरू.
- निर्वाचित महिला सदस्यांना पंचायत–राज प्रशिक्षण



### शेती सुधारणा

- चारसूत्री भातशेतीचे प्रात्यक्षिक, एकात्मिक सेंद्रिय–रासायनिक शेतीचा प्रसार
- केंद्रशासनाच्या मदतीने हरितगृह उभारणी, गांडूळखत प्रशिक्षण, पशुसंवर्धन प्रकल्प
- जैव तंत्रज्ञान : केळी व स्टीव्हिया यांचे ऊतिसंवर्धन
- फळबाग लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण

**पाणी, ऊर्जा, हाताला काम ।**
**संख्या-शिक्षण, संघटित ग्राम ।।**



### उद्योजकता विकास

- घायपाताचा धागा व बांबूपासून गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन–प्रशिक्षण
- अहमदाबाद येथील संस्थेच्या मदतीने ग्रामीण उद्योजकता प्रशिक्षण वर्ग
- खाद्यपदार्थांच्या प्रमाणीकरणाची व विक्रीची व्यवस्था
- १,५०० तरुणांना औद्योगिक प्रशिक्षण



### स्थानिक नेतृत्व विकसन

■ ५० गावांमध्ये सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण ■ जिजामाता प्रबोधन केंद्र
■ पाणी समित्यांचे संघटन, अभ्यासहली व तांत्रिक प्रशिक्षण
■ विद्यार्थ्यांच्या क्रीडा–स्पर्धा व क्रीडा – प्रात्यक्षिके ■ ग्रामीण प्रज्ञा व किशोरी विकास प्रकल्प
■ ३ ठिकाणी औपचारिक शिक्षणाची ग्रामीण केंद्रे
■ गीते, पथनाट्ये, नाटके, पुस्तिका व चित्रफिती यांची निर्मिती व प्रसार

**कार्यक्षेत्रे** – पुणे जिल्हा (शिवगंगा व गुंजवणी खोरे – ता. हवेली, भोर, पुरंदर, वेल्हे; साळुंब्रे–ता. मावळ.), शिरवळ (जि. सातारा), रत्नागिरी, अंबाजोगाई( जि. बीड), हराळी ( जि. उस्मानाबाद), हिंगोली नंदुरबार, वाशिम, वर्धा, यवतमाळ, गडचिरोली




## शालेय वयोगटासाठीचे उपक्रम

### नित्य उपक्रम

क्रीडा दले
साप्ताहिक विकासिका
साप्ताहिक विज्ञान दल
छात्र प्रबोधन मासिक
उपासना केंद्र

### प्रासंगिक उपक्रम

विद्याव्रत संस्कार कार्यक्रम
गणेशोत्सव-बर्ची नृत्य पथक
अथर्वशीर्ष पठण
विक्री उपक्रम
(फटाके,राखी,वही,
तिळगूळ)
गिरिभ्रमण सहल, प्रकल्पभेटी
क्रीडा, विज्ञान शिबिर
ग्रामीण परिचय शिबिर
नेतृत्व संवर्धन शिबिर
गावोगावी होणारी
व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे
(या उपक्रमांचे नियोजन
महाविद्यालयीन गटातर्फे
होते.)

**अन्य : नैसर्गिक आपत्तीतील मदतकार्य**
(कोयना, किल्लारी, बिहार, आंध्र, ओरिसा,
सूरत, मोर्वी, त्सुनामी इ. ठिकाणी)
**राष्ट्रीय एकात्मता**- पंजाब सद्‌भावना यात्रा,
काश्मीर अभ्यास, ईशान्य भारत अभ्यास
व मैत्री अभियान, समाज ऐक्य समिती,
मातृभूमी पूजन कार्यक्रम

**विकसित भारतासाठी सामर्थ्यशाली युवक-युवतींचे संघटन**

---
नेतृत्वविकसन

---
विस्तार

---
राष्ट्रीय एकात्मता

---
कार्यकर्ता प्रशिक्षण

---
स्त्री-शक्ती प्रबोधन

---

## महाविद्यालयीन गटासाठीचे उपक्रम

### अभ्यास शिबिरे

हिंदुत्व, गीतारहस्य,
साम्यवाद, गांधी विचार,
युद्धकथा, विवेकानंद
इ. विषयांचा अभ्यास

### अभ्यास दौरे

महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर
विविध सामाजिक,
औद्योगिक, शैक्षणिक संस्था
व प्रकल्पभेटी

### सहली

गिरिभ्रमण सहल,
सायकल सहल

### सामाजिक जाणीव संवर्धनासाठी

वंचित गटातील
मुला-मुलींसाठी
व्यक्तिमत्त्व विकसनाचे उपक्रम

### प्रासंगिक उपक्रम

गणेशोत्सव - वाद्य पथक,
ध्वज पथक, बर्ची पथक
युवक - युवती मेळावे
व्याख्यानमाला (शिवजयंती, विजयादशमी,
स्वातंत्र्यदिन इ. निमित्ताने)
'युवा संवाद' मासिकाचे
प्रायोगिक अंक प्रकाशित

**शिक्षण, संशोधन, संघटन, ग्रामविकसन, आरोग्य**

# ज्ञान प्रबोधिनी

कार्यक्षेत्रे - पुणे, निगडी, साळुंब्रे, सोलापूर, अंबाजोगाई, हराळी, सांगली, इचलकरंजी, डोंबिवली, बोरिवली, अलिबाग, रसायनी, रत्नागिरी व महाराष्ट्रात २० ठिकाणी प्रासंगिक उपक्रम केंद्रे.
मुख्य केंद्र - ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०. ☎ ०२०-२४२०७०००
ई-मेल-contact@jnanaprabodhini.org संकेतस्थळ-www.jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी

स्वामी विवेकानंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था
देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढविणारी
गतिशील संघटना प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची, नेतृत्वाची
व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ

कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये – सर्जनशीलता, समग्रता, सहविचार, स्वावलंबन

## सर्वंकषता, सर्वसमावेशकता आणि एकात्मता यांचा समन्वय म्हणजे

# समग्रता

शालेय अभ्यासातील यशाबरोबरच मनसोक्त मैदानी खेळ खेळणे, सभा जिंकणे, वेगवेगळे प्रकल्प करणे, मोठ्यांच्या मुलाखती घेणे, देशातील घडामोडींचा अभ्यास करणे, संकटकाळी इतरांच्या मदतीला धावून जाणे, एखाद्या कलेत पारंगत होणे, जिद्दीने एखादे काम पूर्ण करणे, नवनवीन सुचणे, अनेक गोष्टी स्वत:च्या स्वत:ला शिकता येणे, भावनांवर योग्य नियंत्रण ठेवता येणे, गटात काम करता येणे इ. असा सर्वंकष विकास आणि आपल्या चालण्या–बोलण्या–वागण्यातील एकवाक्यता असणे म्हणजेच एकात्मिक विकास या दोन्हीला मिळून म्हणायचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातली समग्रता. वेगाने बदलणाऱ्या काळात अनेक विषयांची गुंतागुंत

## ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यप्रणालीतील समग्रतेचे काही आविष्कार

**समग्र विकास** – शारीरिक–मानसिक–बौद्धिक– सामाजिक–आत्मिक विकासाचा एकत्रित विचार

**समग्र शिक्षण** – क्रमिक शिक्षण–कौशल्यांचे शिक्षण–अनुभव शिक्षण–संघटना शिक्षण–सामाजिक जाणिवा समृद्धीचे शिक्षण–राष्ट्रीय चारित्र्याचे शिक्षण एकत्रितपणे देणाऱ्या शिक्षणप्रणालीची निर्मिती

**समग्र कार्यविस्तार** – शिक्षण–संशोधन–उद्योग–ग्रामविकसन–आरोग्य–संघटन–स्त्री शक्ती प्रबोधन– राष्ट्रीय एकात्मता या दिशांनी परस्परपूरक व एकत्रितपणे कार्याचा विस्तार

**समग्र दृष्टिकोन** – कालोचित बदलानुसार संस्कृतीच्या आचरणाबरोबरच आधुनिक विज्ञान– तंत्रज्ञानाचा अंगीकार आणि राजकीय–भाषिक–आर्थिक–सांप्रदायिक गटांमध्ये सामंजस्याचे पूल बांधण्याची सर्वसमावेशक भूमिका

## संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

शिक्षण । संशोधन । ग्रामविकसन । आरोग्य । नेतृत्व विकसन । स्त्री शक्ती प्रबोधन । राष्ट्रीय एकात्मता

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०,
०२०-२४२०७००० www.jnanaprabodhini.org

# ज्ञान प्रबोधिनी


ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे


ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे


मातृमंदिर, ज्ञान प्रबोधिनी, निगडी


ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी


ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर सोलापूर


ज्ञान प्रबोधिनी हराळी

५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

© ज्ञान प्रबोधिनी

प्रकाशक : कार्यवाह,
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मूल्य : ₹ ७५/–

प्रधान कार्यालय – ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०.
दूरभाष क्र. (०२०) २४२०७०००
e-mail: contact@jnanaprabodhini.org